बुधवार, २ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १०५
www.ramprahar.com


# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

पोलीस ठाण्यात व्हिडीओ काढून व्हायरल करणारा गजाआड/२
साजगाव यात्रेचे नियोजन खोपोली पालिकेकडेच/५
जिल्हास्तरीय जिम्नॅस्टीक्स स्पर्धेत खेळाडूंचे सुयश/८

## देशातील मोठ्या बँकांसाठी डिजिटल रूपी उपलब्ध



**मुंबई :** रिझर्व बँकेने जारी केलेली डिजिटल करन्सी म्हणजेच डिजिटल रूपी मोठ्या बँकांच्या वापरासाठी सुरू झाली आहे. डिजिटल रूपी ही देशाच्या आर्थिक क्षेत्रातील मोठे पाऊल असल्याचे जाणकार सांगत आहेत. त्याचे फायदे लवकरच दिसून येतील. देशभरात यूपीआय आणि किंवा क्यूआर कोडवर आधारित पेमेंट पद्धती लवकर लागू केल्याने तिचे फायदे साऱ्या देशाने पाहिले आहेत. आता या डिजिटल करन्सीचेही वेगळे फायदे दिसून येतील असे जाणकार सांगत आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया या सरकारी बँकांसह एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्र बँक, येस बँक, आयडीएफसी फर्स्ट बँक आणि एचएसबीसी या बँका सध्या डिजिटल रूपीचे व्यवहार करू शकणार आहेत.

# राज्यात होणार मेगा भरती

## विविध विभागांत तब्बल ७५ हजार पदे भरली जाणार

### शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना महामारीमुळे नोकरभरतीला घातलेली ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करीत आता शंभर टक्के नोकरभरती करता येणार असल्याचा निर्णय राज्य सरकरने घेतला आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात राज्यात शासनाच्या २९ विभागांमध्ये ७५ हजार पदांची नोकर भरती केली जाणार आहे. राज्य सरकारने या संदर्भातील शासकीय आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार सरकारने ज्या विभागाचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला आहे, अशा ठिकाणी सरळ सेवेच्या कोट्यातील रिक्त पदे १०० टक्के भरण्याची मुभा दिली आहे. ज्या विभाग-कार्यालयांचा



सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही अशांतील गट अ, ब आणि कमधील (वाहनचालक व गट ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात येत आहे. (अ) आणि (ब) प्रमाणे शिथीलता केवळ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदभरतीसाठी १५ ऑगस्ट २०२३पर्यंत लागू राहील. त्या पुढील भरती प्रक्रिया वित्त विभाग शासन निर्णय ३० सप्टेंबर २०२२ अन्वये करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

कोरोना महामारीमुळे राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाल्याने नोकरभरतीवर राज्य सरकारने बंधने आणली होती. ५० टक्के मर्यादा ठेवून नोकरभरती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, पण कोविड संपताच शिंदे-फडणवीस सरकारने ही मर्यादा उठवली आहे. त्यामुळे आता शंभर टक्के नोकर भरती होणार आहे.

**संभाव्य नोकरभरती**

- **आरोग्य खाते : १० हजार ५६८**
- **गृह खाते : ११ हजार ४४३**
- **ग्रामविकास खाते : ११,०००**
- **कृषी खाते : २५००**
- **सार्व. बांधकाम खाते : ८,३३७**
- **नगरविकास खाते : १५००**
- **जलसंपदा खाते : ८२२७**
- **जलसंधारण खाते : २,४२३**
- **पशुसंवर्धन खाते : १,०४७**



## सहकारी गृहनिर्माण संस्था निवडणूक प्रक्रियेची कालमर्यादा कमी करावी

### पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संघाची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेची कालमर्यादा दोन महिन्यांवरून १४ दिवसांची करण्यात यावी, अशी मागणी पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादितच्या वतीने कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे सहकारमंत्री अतुल सावे यांच्याकडे करण्यात आली आहे. या संदर्भात मंगळवारी (दि. १) ना. सावे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देतेवेळी पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादितचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष कुंडलिक काटकर, संचालक बाळासाहेब पडवळ आदी उपस्थित होते. या निवेदनात म्हटले आहे की, २५०पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका म. स. सं. अधिनियम १९६०चे कलम ७३ क ब व निवडणूक नियम ७६नुसार घेण्यात येत असून या निवडणूक प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी हा सुमारे दोन महिन्यांचा आहे. ही निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहणाऱ्या व्यक्तींना मानधन ७५०० रुपये देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. हे मानधन दोन महिन्यांच्या कालावधीसाठी कमी असल्याने निवडणूक अधिकारी २५०पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी नाखुश दिसत आहेत. त्यामुळे २५०पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका मूळ निवडणूक नियम ७६ (जुन्या पद्धतीने म्हणजे १४ दिवसांची नोटीस देऊन अधिमंडळाच्या सभेत निवडणूक पूर्ण करणे) नुसार घेण्याबाबत योग्य ते बदल व्हावेत. असा बदल झाल्याने संस्थांच्या खर्चात बचत तर होईलच, त्याचबरोबर निवडणूक अधिकाऱ्यांनासुद्धा योग्य मानधन मिळेल व कमी वेळेत निवडणुका पार पडतील. त्या अनुषंगाने निवडणूक नियम क्र. ७६मध्ये योग्य ती तरतूद करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## सत्तासंघर्ष सुनावणी चार आठवडे लांबणीवर

### लिखित बाजू मांडण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाची सुनावणी चार आठवडे लांबणीवर गेली आहे. सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (दि. १) झालेल्या सुनावणीत घटनापीठाने दोन्ही पक्षकारांना लिखित बाजू मांडण्यास सांगितले आहे. दोन्ही बाजूने कोणते मुद्दे मांडण्यात येतील आणि कोणते वकील कोणत्या मुद्यांवर युक्तिवाद करणार याची माहितीदेखील देण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत.

राज्यातील सत्तासंघर्षावरील निर्णय पुढे गेला आहे. खरी शिवसेना कोणाची? याचा निवाडा निवडणूक आयोग करेल, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट करीत शिंदे गटाला दिलासा दिला होता. त्या वेळी आमदारांच्या अपात्रतेबाबत आणि सत्तासंघर्षावेळी निर्माण झालेल्या इतर कायदेशीर पेचांबाबत न्यायालयाने कुठलेही निर्देश दिले नव्हते. अशात मंगळवारच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू झाल्यानंतर धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठाने दोन्ही पक्षकारांना लिखित माहिती देण्याचे निर्देश दिले. या प्रकरणातील सुनावणी सुरू करण्याआधी दोन्ही बाजूने एकत्रितपणे आपले मुद्दे सादर करावे, असे घटनापीठाने म्हटले. दोन्ही पक्षकारांचे कनिष्ठ वकील या बाजू मांडू शकतात. सुप्रीम कोर्टाच्या पुढील सुनावणीत सत्तासंघर्षाच्या सुनावणीचा कालावधी निश्चित होण्याची शक्यता आहे.

## जालन्यात स्टील कंपनीमध्ये स्फोट; सात जणांचा मृत्यू

**जालना : प्रतिनिधी**

जालन्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये मंगळवारी (दि. १) झालेल्या स्फोटात जवळपास सात जणांचा मृत्यू झाला आहे. अनेक कामगार या स्फोटात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

जालना औद्योगिक वसाहतीत असलेल्या गीताई स्टील कंपनीत मंगळवारी सकाळी भीषण स्फोट झाला. या कंपनीत स्टील वितळविण्याची भट्टी होती. स्फोटामध्ये या भट्टीचे तुकडे झाले आहेत. यात सात कामगारांचा मृत्यू झाला असून हा आकडा वाढण्याची भीती आहे.

## निवडक

### मेहुल चोक्सीला 'सेबी'कडून शेअर मार्केटमध्ये व्यापारास बंदी

**नवी दिल्ली :** सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने (सेबी) गीतांजली जेम्स लिमिटेडच्या शेअर्सच्या फसवणूकप्रकरणी फरार उद्योगपती मेहुल चोक्सीला शेअर मार्केटमध्ये १० वर्षांसाठी व्यापार करण्यास बंदी घातली आहे. यासोबतच पाच कोटींचा दंडही ठोठावला आहे. दंडाची रक्कम ४५ दिवसांच्या आत जमा करावी लागेल, असेही 'सेबी'ने आपल्या आदेशात म्हटले आहे.

### आता कर्नाटकातही पर्यटकांची हुल्लडबाजी; कार थेट पुलावर

**बंगळुरू :** गुजरातच्या मोरबी येथील मच्छू नदीवरील झुलता पूल कोसळल्यामुळे १३०पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. या पुलावर काही तरुण उड्या मारतानाचा व्हिडीओ समोर आला होता. आता कर्नाटकमधील येल्लापुरा शहरातील अशाच एका झुलत्या पुलाचा व्हिडीओ समोर आला आहे. या पुलावर पर्यटकांनी चक्क कार आणल्याचे या व्हिडीओत दिसत आहे. मोरबी येथील दुर्घटना ताजी असतानाच हा व्हिडीओ समोर आल्यानंतर संताप व्यक्त केला जात आहे.

## पनवेलमध्ये पाण्याची नवीन पाईपलाईन

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पाठपुरवठ्याने शहरातील धूतपापेश्वर ते दगडी शाळा येथे नवीन आठ इंची पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. महापालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या या कामाचे भूमिपूजन मंगळवारी (दि. १) परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

भूमिपूजन कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष श्रीनंद पटवर्धन, माजी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नितीन पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, नीता माळी तसेच नंदा ओझे, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, बूथ अध्यक्ष सुशांत पाटणकर, सोहन जोशी, तन्मय पटवर्धन, अदिती ओझे, महेंद्र गोडबोले, प्रशांत शेट्ये यांच्यासह सी. जे. मुनोत नगर ए विंग ते जी विंग, पुरुषोत्तम सदन, गोविंद अनंत, गुरू आशिष, आदित्य विहार, मंगल कलश, श्री स्वामी समर्थ, श्री सदन इत्यादी गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी व रहिवासी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

## टाटा समूह मिहानमध्ये गुंतवणूक करण्यास उत्सुक

### टाटा सन्सच्या अध्यक्षांचे ना. गडकरींना पत्र

**नागपूर : प्रतिनिधी**

टाटा समूह मिहानमध्ये गुंतवणूक करण्यास उत्सुक असल्याचे टाटा सन्सचे अध्यक्ष नटराज चंद्रशेखरन यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र पाठवून सांगितले आहे. ना. गडकरी यांनी ७ ऑक्टोबर रोजी चंद्रशेखरन यांना पत्र पाठवून नागपुरातील मिहान सेझमध्ये गुंतवणुकीची मोठी संधी असल्याचे सांगत त्यांचे त्याकडे लक्ष वेधले होते. त्यावर चंद्रशेखर यांनी हे पत्र लिहिले आहे.

मिहानमध्ये उद्योग पायाभरणीच्या संधीबाबत विदर्भ इकोनॉमिक डेव्हलपमेंट काउन्सिल म्हणजेच 'वेद'ने एक आराखडा तयार केला आहे. त्याचा उल्लेख केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी टाटा समूहाला पाठविलेल्या पत्रात केला होता. आता टाटा समुहाने



ना. गडकरी यांना पाठविलेल्या पत्रात टाटा समूहाची टीम नागपूर मिहानमधील उद्योग विस्ताराच्या संदर्भात 'वेद'च्या संपर्कात राहील असे म्हटले आहे.

टाटा समुहाचा मिहानमधील प्रस्तावित एअरबस प्रकल्प गुजरातमध्ये गेल्यानंतर आता याच टाटा समूहाकडून नागपूरच्या मिहान सेझमध्ये उत्सुकता दाखवणे नागपूरसह महाराष्ट्रासाठी सकारात्मक मानले जात आहे. दरम्यान, टाटा समुहाची टीम नागपुरात आली तर आम्ही त्यांना आवश्यक ते सहकार्य करू, असे 'वेद'चे उपाध्यक्ष प्रदीप माहेश्वरी यांनी म्हटले आहे.

## भारताची आज बांगलादेशविरुद्ध लढत

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी-२० विश्वचषकात भारताचा सामना बुधवारी (दि. २) बांगलादेशशी होणार आहे, पण हवामान खात्याच्या अंदाजानुसार या दिवशी ॲडलेडमध्ये पावसाची ६० टक्के शक्यता आहे, तर मैदान दिवसभर काळ्या ढगांनी झाकलेले असेल.

भारताने यंदाच्या विश्वचषकात पाकिस्तान आणि नेदरलँडविरुद्ध सलग दोन विजय नोंदविले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात मात्र भारतीय संघाचा पराभव झाला. भारताचे आता ग्रुप स्टेजमध्ये दोन सामने बाकी आहेत, पण हवामान पाहता भारताचा

### पावसाचे सावट




उपांत्य फेरीचा रस्ता इतका सोपा होणार नाही असे दिसते. टीम इंडियाचा पुढचा सामना बांगलादेशविरुद्ध ॲडलेडमध्ये होणार असून या सामन्यावर पावसाचे सावट आहे. तेथील स्थानिक वेळेनुसार हा सामना संध्याकाळी ६.३० वाजता सुरू होईल. ॲडलेडच्या मैदानावर संध्याकाळी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. रात्री आणखी पाऊस पडू शकतो.

बांगलादेशविरुद्ध सामना पावसामुळे वाहून गेला तर टीम इंडियाला फक्त एक गुण मिळेल. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर भारत गुणतालिकेत चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. भारताला बांगलादेशविरुद्ध एक गुण मिळाल्यास टीम इंडियाचे केवळ पाच गुण होतील, जे उपांत्य फेरी गाठण्यासाठी अपुरे आहे. अशा स्थितीत भारताला ग्रुप स्टेजच्या शेवटच्या सामन्यात झिम्बाब्वेविरुद्ध विजयाची नोंद करावी लागेल.

## पंतप्रधानांकडून मोरबी दुर्घटनास्थळाची पाहणी

**मोरबी : वृत्तसंस्था**

गुजरातच्या मोरबी येथील मच्छू नदीवर असलेला १०० वर्षे जुना झुलता पूल कोसळल्याची घटना रविवारी संध्याकाळच्या सुमारास घडली होती. या घटनेत १३०पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला. दरम्यान, या ठिकाणी पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी (दि. १) भेट देत पाहणी केली.

पंतप्रधान मोदी तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. त्यांनी सोमवारी रात्री गांधीनगरमध्ये उच्चस्तरीय बैठक बोलावली होती. या बैठकीत पंतप्रधानांनी मोरबी दुर्घटनेच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर मंगळवारी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करून माहिती घेतली.

## मानाची राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

**शुक्रवारपासून प्रारंभ; प्रथम क्रमांकास एक लाख रुपये अन् करंडक**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही मानाची अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे यंदा नववे वर्ष आहे. स्पर्धेचे मुख्य प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि., तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरत रहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकिका या दर्जेदार



स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली.

दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे ही स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रकमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवारपासून विभागनिहाय प्रारंभ होणार आहे. त्यानुसार पुणे केंद्रावर ४ व ५ नोव्हेंबरला, सातारा केंद्र ६ नोव्हेंबर, रत्नागिरी ८ नोव्हेंबर, जळगाव व नागपूर केंद्र १२ नोव्हेंबर, नाशिक १३ नोव्हेंबर, रायगड (पनवेल) १९ व २० नोव्हेंबर, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली केंद्रांची प्राथमिक फेरी २४ ते २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तर अंतिम फेरी २ ते ४ डिसेंबर रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. **(पान २ वर..)**

# शारीरिक शिक्षक, ग्रंथपाल पदभरतीसाठी कार्यवाही करावी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीत सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अनुदानित महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक पदांचा आढावा घेऊन संबंधित पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही करावी. राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रलंबित अनुदान दरात ६० टक्के वाढ करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालय प्रशासनाला दिलासा मिळाला आहे.



मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण विभागातील रिक्त पदांचा तसेच वस्त्रोद्योग विभागातील सूत गिरण्यांच्या पुनर्वसनाबाबत आढावा बैठक मंगळवारी (दि. १) झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाचे प्रधान सचिव नितीन गद्रे, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता, वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, तंत्र शिक्षण संचालक अभय वाघ यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सहायक प्राध्यापक पदाबरोबरच शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक पदे भरण्यासंदर्भात पदांचा आढावा घेऊन पदभरतीची कार्यवाही करावी, तसेच राज्यातील अभिमत विद्यापीठातील आर्थिक व सामाजिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाची प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्यासाठी अभिमत विद्यापीठांचा शुल्क नियंत्रण समितीच्या अंतर्गत कार्यवाही करणे बंधनकारक असणार आहे, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वितरीत करण्यास विलंब होऊ नये, यासाठी उपाययोजना आखण्याच्या सूचनाही संबंधित विभागास देण्यात याव्यात.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आवश्यक असलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षकीय पदांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या, विद्यार्थ्यांचे हित, विभागाची निकड विचारात घेता, वित्त विभागाकडे सादर केलेल्या रिक्त जागांपैकी दोन हजार ८८ पदांच्या पदभरतीस मान्यता दिली आहे. याची कारवाही सुरू आहे, परंतु शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक पदभरण्यास मान्यता देणे गरजेचे असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रलंबित अनुदान दरात ६० टक्के वाढ करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

सहकारी सूत गिरण्यांना राष्ट्रीय सहकारी विकास निगमच्या योजनेअंतर्गत आधुनीकीकरण, विस्तारीकरण आणि पुनर्वसन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. सूतगिरण्यांचे पुनर्वसन करताना प्रत्येकी सूतगिरणीचे पुनर्वसन होत आहे का, अर्थसहाय केल्यानंतर सूतगिरण्या नव्याने सुरू होत आहेत का, यासंदर्भातील अहवाल सादर करावा. त्यानंतर त्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया राबवावी, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# पोलीस ठाण्यात व्हिडीओ काढून व्हायरल करणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी उपस्थित नसल्याचा फायदा घेत अधिकाऱ्याच्या खूर्चीवर बसून आणि महाराष्ट्र पोलिसांचा लोगो, तसेच पिस्तूल हातात घेऊन हवेत फिरवत असल्याचाही व्हिडीओ इंस्टाग्रामवर प्रसारित करणाऱ्या एकाला पोलिसांनी अटक केली आहे. मोसिन शेख यांनी हे व्हिडीओ पोलीस आयुक्तालयाचे ट्विटर हॅन्डलवर पाठविले होते.




मोसिन शेख यांनी त्यांचे ट्विटर अकाऊंटवरून एका व्यक्ती पोलीस ठाण्यामध्ये पोलीस अधिकारी यांचे खुर्चीमध्ये बसून, खुर्चीचे मागे असलेला महाराष्ट्र पोलीसचा लोगो, तसेच त्याने हातात पिस्तूल धरून ते हवेत फिरवित असल्याचा व्हिडीओ इंन्स्टाग्रामवर प्रसारीत केला आहे. दोन्ही व्हिडीओ मोमिन शेख यांनी पोलीस आयुक्तालयाचे ट्विटर हॅन्डलवर पाठविलेले आहेत. या व्यक्तीने कोणत्या पोलीस ठाण्यात व्हिडीओ काढला आहे, याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी तपास पथकामार्फत शोध घेतला असता, व्हिडीओमधील व्यक्ती ही डोंबिवलीमध्ये राहणारा सुरेंद्र पांडुरंग पाटील हा आहे, तसेच तो महाराष्ट्र नरबळी व अंधश्रद्धा निर्मुलन कायद्यामधील फिर्यादी असून, गुन्ह्याचा तपास मानपाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण गोरे हे करीत आहेत.

तपासात जप्त केलेली गुन्ह्याची रक्कम ही सुरेंद्र पांडुरंग पाटील उर्फ चौधरी याची असल्याने न्यायालयाचे आदेशानुसार तो २५ ऑक्टोबर रोजी मानपाडा पोलीस ठाण्यात आला होता. त्यावेळी श्रीकृष्ण गोरे हे त्यांचे कक्षातून मुद्देमाल कक्षात गेले असता, कक्षात कोणीही नसल्याचा फायदा घेऊन सुरेंद्र पाटीलने कक्षातील अधिकाऱ्यांच्या खूर्चीवर बसून व्हिडीओ काढला आहे. त्यामुळे सुरेंद्र पांडुरंग पाटील याचेविरुद्ध मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे, तसेच परवानाधारक शस्त्र आणि पाच जिवंत काडतुसे असा ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### आधीही सात गुन्हे दाखल

दरम्यान सुरेंद्र पांडुरंग पाटीलच्या मर्सिडीज कार (क्र. एमएच.०५ ईटी. ७८८८)ची तपासणी केली असता, त्यात एक बेकायदेशिर कुकरी आढळली आहे. त्याबाबतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीविरुद्ध मानपाडा, कोळशेवाडी व महात्मा फुले पोलीस ठाण्यात एकूण सात गुन्हे दाखल आहेत.

### सांस्कृतिक कट्टा

**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल**

**नवे गोकुळ**

**भ भुताचा**

**बँक ऑफ बालपण**

**सोनेरी स्वप्न**

**(२ नोव्हेंबर, रात्रौ ८.३० वा.)**

## पान १ वरून

### पनवेलमध्ये पाण्याची नवीन पाईपलाईन

पनवेल शहराचा भौगोलिक विचार करता महात्मा फुले रस्ता, लोकमान्य टिळक रस्ता, राम गणेश गडकरी रस्ता हा परिसर अत्यंत प्राचीन परिसर मानला जातो. या परिसरात अनेक वाडे अस्तित्त्वात होते. कालांतराने शहरीकरणामुळे वाड्यांचे रूपांतर विविध सोसायटीमध्ये झाले. परिणामी लोकसंख्यादेखील वाढली. एवढ्या लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा होत नव्हता तसेच भविष्यातील टोलेजंग इमारतींचा डेव्हलपमेंटचा विचार लक्षात घेता महात्मा फुले रस्त्यावर धूतपापेश्वर ते दगडी शाळा एवढ्या पट्ट्यात होणारा पाणीपुरवठा अपुरा आहे. या पट्ट्यात दोन पाण्याच्या लाईन्स आहेत एक आठ इंची व एक ६ इंची. कोविड काळात या भागातील सहा इंची पाईपलाईनमध्ये ड्रेनेज पाणी मिसळले गेले. त्यामुळे ती लाईन बंद करून पूर्ण भार आठ इंची लाईनवर टाकावा लागला.

या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पाठपुरवठ्याने धूतपापेश्वर ते दगडी शाळा येथे सात लाख ८५ हजार ४१३ रुपये खर्च करून नवीन आठ इंची पाईपलाईन टाकण्यात येत आहे. यामुळे सी. जे. मुनोत नगर ए विंग ते जी विंग, आदित्य विहार सोसायटी, मंगल कलश सोसायटी, श्री स्वामी समर्थ सोसायटी, श्री सदन सोसायटी आणि नव्याने होऊ घातलेली गुरू आशिष सोसायटी या सर्व सोसायट्यांना उद्‌भवणारी पाण्याची समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक सोसायटीच्या प्रत्येक विंगला मुबलक पाणीपुरवठा होणार आहे. त्याबद्दल परिसरातील नागरिक आमदार प्रशांत ठाकूर, युवा नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांना धन्यवाद देत आहेत.

### मानाची राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

**अशी आहेत पारितोषिके**

प्रथम एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ५० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय २५ हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ १० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ एकूण दोन बक्षिसे प्रत्येकी पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे असून या प्रमुख बक्षिसांचे प्रायोजक श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आहे. वैयक्तिक व विशेष बक्षिसांचे प्रायोजक नील ग्रुप असून ती बक्षिसे-सर्वोत्कृष्ट अभिनेता (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट लेखक (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट संगीत (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट नेपथ्य (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना (वैयक्तिक) प्रथम दोन हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय एक हजार ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय एक हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ ५०० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, रायगड जिल्हा प्राथमिक फेरीकरिता विशेष पारितोषिके प्रथम १० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय सहा हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय चार हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, अंतिम फेरीकरिता विशेष पारितोषिके सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका, महाराष्ट्रातील अस्सल मायबोली एकांकिका, लोककलेवर आधारित एकांकिका, सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार व बालकलाकार यांनाही विशेष पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.


**नमुना-१**

**उपविभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल यांजकडून**

**जाहीर नोटीस**

क्र.उविअ/भुसं/कात-५/गुळसुंदे, कराडे खुर्द/एस.आर. ---/२०२२
उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कार्यालय
पत्ता :- जुना ठाणा नाका रोड, पनवेल ता.पनवेल, जि.रायगड,
दिनांक :- ०१ /११/२०२२

ज्याअर्थी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचेकडील पत्र क्र. का.अ.सा.बां.वि/पनवेल/प्रली/१२५१ दिनांक ०५/०४/२०२१ अन्वये यांनी मौजे १) गुळसुंदे, २) कराडेखुर्द, क्षेत्र हे.आर.गुळसुंदे व कराडेखुर्द येथील जमिनींचे राज्यमार्ग १०७ गुळसुंदे ते राज्यमार्ग १०४ कराडे खुर्द, कराडे बु., जांभिवली-सावणे, प्रजिमा-८९ रस्ता सुधारणा प्रकल्प या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२/५/२०१५, दिनांक ३०/९/२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नावे घेणेकामी प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, मा.जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.भूसंपादन/टे-६/मौजे-गुळसुंदे, कराडेखुर्द/२०२१, दिनांक २८/०६/२०२१ व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचेकडील पत्र दिनांक ०५/०४/२०२१ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच महसूल व वनविभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.एलक्युएन०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५/१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याअर्थी आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, राहुल मुंडके, उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल याद्वारे,

**(एक)** अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे आणि

**(दोन)** प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेडयुल-१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी मोबदला निश्चित करण्यात येईल.

**(तीन)** संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांचे नांवे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबत संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी), पनवेल उपविभाग पनवेल यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल /कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करणेत आलेल्या क्षेत्राच्या आलेल्या आराखडयाची प्रत उप विभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची - एक**

**थेट खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशिल**

**१) गाव - गुळसुंदे, तालुका - पनवेल जिल्हा - रायगड**

| अ. नं. | खातेदाराचे नाव | स.नं./ हि.नं. | भुसंपादन क्रमांकानुसार संपादीत करावयाचे अंदाजे क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | सुनिल दगडु म्हस्कर | १० | ०.१२.७० |
| २ | लक्ष्मण काशिनाथ सावंत, गजानन काशिनाथ सावंत, इंदिराबाई काशिनाथ सावंत | ११ | ०.०६.३० |
| ३ | अर्चना महेंद्र कुमार कंपानी, चंदेश महेंद्र कुमार कंपानी, | १३/१ | ०.११.३० |
| | सुजाता मितेश मेहता, मिशीका साहील मेहता | | |
| ४ | प्रोटेक्ट फॉरेस्ट बिनआकारी पड | १४ | ०.३०.८० |
| ५ | डिंपल ड्रम बॅरलस कं. डायरेक्टर हिरालाल अमृतलाल कोठाडिया | ३२ | ०.०२.५० |

**२) गाव - कराडेखुर्द, तालुका - पनवेल जिल्हा - रायगड**

| अ. नं. | खातेदाराचे नाव | स.नं./ हि.नं. | भुसंपादन क्रमांकानुसार संपादीत करावयाचे अंदाजे क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | मे.जयसिध्दी होम्स एल.एल.पी. तर्फे भागीदार जगदीश मधुकर चौधरी | ११ | ०.०८.२५ |
| २ | विजय नारायण वैदय, देवस्थान तर्फे ट्रस्टी विनायक नारायण वैदय | १४ | ०.१४.५० |
| ३ | गावठाण | गावठाण | ०.०४.४० |
| ४ | नितीन प्रभुदास सोमानी | १५/२ | ०.००.३५ |
| ५ | फॉरेस्ट पाश्वर | २५ | ०.७१.९५ |
| ६ | मे.अग्रवाल पॅकर्स आणि मुव्हर्स लि. तर्फे ऑथ सिग्नेटरी चंद्रकांत झावऱ्या पवार | २६ | ०.०५.६४ |
| ७ | रिझर्व फॉरेस्ट महाराष्ट्र शासन खारपाडा सावरोली रोड | १३७ | ०.३१.४० |

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०१/११/२०२२

क्र. जिमाका/रा.अ./जाहिरात/१३६/२०२२-२३

**सही/-**
**(राहुल मुंडके)**
उप विभागीय अधिकारी पनवेल
उप विभाग पनवेल

# पनवेलमध्ये पथविक्रेत्यांची पहिली यादी जाहीर

## मनपा शहर फेरीवाला समितीच्या बैठकीत ३०७६ जणांना मान्यता

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत दीनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुसार फेरीवाला धोरणांतर्गत पनवेल महापालिका शहर फेरीवाला समितीची बैठक मंगळवारी (दि. १) झाली. या वेळी सर्वानुमते ३०७६ पथविक्रेत्यांची पहिली यादी अंतिम करण्यात आली.



दीनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाद्वारे फेरीवाल्यांना सहाय्य या घटकामध्ये फेरीवाला धोरणांतर्गत मंगळवारी शहर फेरीवाला समितीची बैठक आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयात घेण्यात आली. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, दिनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विजय कादबाने, वाहतूक शाखेचे संजय नाले व शहर फेरीवाला समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. नागरिकांनी दिलेल्या हरकती व सुचनांवरती या वेळी चर्चा झाली.

फेरीवाल्यांसाठी बाजारपेठांचा विकास करणे, स्थिर फेरीवाल्यांसाठी जागेची निश्चिती करणे अशा विविध विषयांवरती या वेळी चर्चा करण्यात येऊन सर्वानुमते पहिली ३०७६ पथविक्रेत्यांची यादी या वेळी अंतिम करण्यात आली.

फेरीवाला सहाय्य अभियानांतर्गत शहरातील फेरीवाल्याच्या विविध गरजा व समस्या सोडविण्यासाठी महापालिका पुढाकार घेत आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील शहर फेरीवाल्यांची यादी अंतिम झाल्यावर त्यांना सोयी सुविधा देणे सोपे होणार आहे. यामध्ये शहर फेरीवाला समितीचे मोठे योगदान असणार आहे. महापालिकेच्या वतीने येत्या काही महिन्यांमध्ये सुसज्ज असे दैनंदिन मार्केट बांधले जाणार असल्याची माहिती आयुक्त गणेश देशमुख यांनी या वेळी दिली.

# खांदा कॉलनीतील सोसायट्यांच्या दिशादर्शक नामफलकाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी सेक्टर ७ येथे सोसायट्यांच्या दिशादर्शक नाम फलकाचे उद्घाटन पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, भाजप खांदा कॉलनी अध्यक्ष व माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

भाजप जिल्हा कार्यकारणी सदस्य व ज्यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य भिमराव पोवार, कामगार नेते मोतीलाल कोळी, भाजपचे खांदा कॉलनी माजी अध्यक्ष गोपीनाथ मुंडे आणि खांदा कॉलनी येथील सेक्टर ७ एकता रहिवासी संघ यांनी पुढाकार घेऊन या दिशादर्शक नामफलकासाठी प्रयत्न केले. नामफलकाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी तेथील सर्व रहिवासी उपस्थित होते.





# महिला आणि दिव्यांगांना विविध साहित्याचे वाटप : बांधपाडा ग्रामपंचायतीचा उपक्रम



**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने शासनाच्या १५वा वित्त आयोग व महिला बालकल्याण–दिव्यांग सेस निधीतून ६२ दिव्यांगांना सोलर यूपीएस मशीनसह तीन एलईडी बल्प तसेच ५० महिला बचत गटांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

तीन वर्षांपूर्वी थेट सरपंचपदी विराजमान झालेल्या सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर आणि उपसरपंच सुजित भालचंद्र म्हात्रे आणि विद्यमान दहा सदस्यांच्या टीमच्या माध्यमातून कोरोना काळात ग्रामस्थांच्या आरोग्याला प्राधान्य देत नागरिकांना जीवनावश्यक वस्तू, कोरोना प्रतिबंधक किट, गावात सॅनिटायझर फवारणी, लसीचा एक डोस, अशा सर्वोतोपरी सुविधा देण्यात आले. पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्याच्या उद्देशाने सामाजिक वनीकरण मोहिमेंतर्गत आंबा काजू नारळाची झाडे लावण्यात आली. घरोघरी कचराकुंडी वाटप आणि शाळेच्या नवीन वास्तुसाठी निधी मिळविण्याचे कार्य करून उर्वरित कार्यकाळात ग्रामपंचायतीतर्फे गावासाठी रुग्णवाहिका आणि घंटागाडी देण्याचे अभिवचन देण्यात आले.

ग्रामपंचायत खोपटेतर्फे आयोजित या कार्यक्रमात सरपंच विशाखा ठाकूर, उपसरपंच सुजित म्हात्रे यांच्या समवेत भावना पाटील, राजश्री पाटील, देवानंद पाटील, शुभांगी ठाकूर, रितेश ठाकूर, अच्युत ठाकूर, मीनाक्षी म्हात्रे, करिष्मा म्हात्रे, संदेश म्हात्रे, जागृती घरत या ग्रामपंचायत सदस्यांसंमवेत ग्रामविकास अधिकारी रूपम गावंड, गाव कमिटी अध्यक्ष विश्वनाथ पाटील,उपाध्यक्ष कमलाकर म्हात्रे, सचिव कुमार ठाकूर, पाणी कमिटी अध्यक्ष महेंद्र पाटील, तंटामुक्त कमिटी अध्यक्ष प्रमोद ठाकूर, राजेंद्र म्हात्रे, यशवंत ठाकूर, संतोष पाटील, निलेश भगत असे पाडा अध्यक्ष तथा महिला बचत गट पदाधिकारी व सीआरपी आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सुनील वर्तक यांनी तर प्रास्ताविक करून आभार देवानंद पाटील यांनी मानले. कार्यक्रासाठी ग्रामपंचायत कर्मचारी, बचत गट प्रतिनिधी, दिव्यांग प्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले.

# खारघरच्या डोंगरांमध्ये वाघ असल्याची अफवा


## वनविभागाकडून माध्यमांतील वृत्ताचे खंडण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरच्या डोंगरांमध्ये वाघाचा वावर असल्याचे वृत्त सोमवारी रात्री समाजमाध्यमांवर झळकले. तसेच विविध बातम्यांमधून वाघ दिसला असल्याच्या शक्यता मंगळवारी (दि. १) वर्तवण्यात आल्या होत्या, मात्र खारघरच्या डोंगरांमध्ये वाघाचा वावर असल्याचे वृत्त खोट असल्याचे एका वन अधिकाऱ्याने सांगितले आहे.

खारघरच्या डोंगरांमध्ये वाघाचा वावर असल्याने येथील आदिवासी वाड्यांवरील लोकवस्ती धास्तावली आहे. गेल्या महिन्याभरात वाघाचा तीन वेळा वावर दिसला आहे. पहिल्या दोन घटनांमध्ये टाटा पावर कंपनीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या परिसरात वाघ दिसला. तसेच दोन आठवड्यापूर्वी बेलापूरकडून खारघर हिलवरील चाफेवाडी आदिवासी वाडीकडे जाण्याच्या रस्त्यावर बोगद्याजवळ पारधी कुटूंबीयांनी हाकेच्या अंतरावरून वाघाला पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे, अशा आशयाच्या बातम्या समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाल्या. तसेच याबाबतची व्हिडीओ क्लीपदेखील व्हायरल झाली.

वाडीतील एका जागरुक व्यक्तीने खारघर हिलवर वाघ असल्याची लेखी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना आणि वनविभाग तसेच सिडकोच्या सूरक्षा विभागाला दिली. खारघर हिलवर नेहमी सायंकाळी व पहाटे वॉकींगसाठी शेकडो खारघरवासियांची ये–जा सुरू असते. या तीनही घटनांमध्ये वाघाची माहिती सिडको सूरक्षा विभागाने वन विभागाला दिल्याचे सूरक्षा विभागाचे बाळू पाटील यांनी सांगितले, असेही प्रसिद्ध झाले होते.



व्हायरल व्हिडीओमधील दृष्ये

दरम्यान, खारघर परिसरात वाघाचा वावर या बातमीची सत्यता समजण्यात यावी, अशी मागणी भाजप खारघर सरचिटणीस दीपक शिंदे यांनी पनवेल वन परिक्षेत्र अधिकारी ज्ञानेश्वर सोनवणे यांच्याकडे केली होती. यात त्यांनी आपल्या वनपरिक्षेत्रात मंगळवारी (दि. १ नोव्हेंबर) काही वृत्तपत्रांमध्ये खारघरच्या डोंगरावर वाघाचा वावर असल्याची बातमी प्रसिद्ध झाली. पंधरा दिवसांपूर्वीसुद्धा टाटा पॉवर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी व चाफेवाडी येथील पारधी कुटुंबीयांनी या परिसरात वाघाला पाहिल्याचे वृत्त वाचनात आले. या खारघर हिल्सवर अनेक नागरिक मॉर्निंग वॉकला जातात तसेच चाफेवाडी व फणसवाडीसारख्या पाड्यात आदिवासी बांधव राहात आहेत. त्यांच्यात भीतीचे वातावरण पसरल्याचे सुद्धा ऐकण्यात येत आहे. या बातमीतील सत्यता अजून अधिकृतपणे जाहीर करून सत्यता नागरिकांना समजावी. बातमी खरी असेल तर वाघ पकडण्यासाठी प्रयत्न लागेल तसेच नागरिकांना सुरक्षेच्या हेतूने या परिसरात येण्या–जाण्यापासून मज्जाव करावा लागेल, जेणेकरून कोणत्याही प्रकारची जीवितहानी होणार नाही, अशा आशयाचे पत्र वनविभागाकडे शिंदे यांनी पाठविले होते. तसेच या पत्राची प्रत पनवेल महापालिका आयुक्त, पनवेलचे आमदार, खारघर वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पाठविली होती.

यानुसार पनवेल वन परिक्षेत्र अधिकारी ज्ञानेश्वर सोनवणे यांनी खारघर परिसरात वाघाचा वावर असल्याची बातमी खोटी असल्याचे आमच्या प्रस्तुत प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# कामोठे येथे अज्ञाताने पाच मोबाइलसह रोख रक्कम पळवली

**पनवेल : वार्ताहर**

चार व्यक्ती आराम करण्यासाठी गाडीमध्ये झोपलेले असताना अज्ञात व्यक्तीने गाडीचा दरवाजा उघडून पाच मोबाइल फोन व रोख रक्कम चोरून नेल्याचा प्रकार कामोठे येथे घडला आहे.

दादर ईस्ट, मुंबई येथील अनिकेत भिंगार्डे हे ॲक्सिस बँक लोन सेंटरमध्ये सीनियर रिलेशनशिप ऑफिसर आहेत. जितेंद्र कुमार कटारिया, किशोर रवळे, पांडे हे वॅगनार गाडी घेऊन लोनच्या कामासाठी पुण्याला गेले होते. काम संपल्यानंतर रात्री मुंबई येथे येण्यासाठी गाडीने निघाले. अनिकेत गाडी चालवत होता. व तिन्ही ऑफिसर गाडीत बसले होते. या वेळी थोडा वेळ आराम करू या असे त्यांच्यात बोलणे झाले. मध्यरात्री साडेतीन वाजता पुणे मुंबई लेनवर सीएनजी पंपाच्या समोर स्काय वॉकच्या खाली कामोठे येथे आले असता गाडी रस्त्याच्या बाजूला उभी केली. व काही वेळ आराम करण्यासाठी सर्वजण गाडीमध्ये झोपले.

या वेळी मोबाइल गाडीच्या चार्जिंग पॉइंटला लावले होते. साधारण पावणे पाच वाजता अनिकेतला जाग आली. त्याला पाच मोबाइल दिसून आले नाहीत. तसेच अनिकेत यांच्या पॅन्टचा उजवा खिसा कापला असल्याचे लक्षात आले. त्यांच्या खिशातून १३ हजार २०० रक्कम चोरून नेण्यात आली व ४६ हजार २०० रुपयांचे पाच मोबाइलदेखील चोरून नेण्यात आले.

# उरणमध्ये श्री जलाराम जयंती उत्सव साजरा

**उरण : वार्ताहर**

भवरा रोडजवळील भवरा तलाव येथील श्रीजलारामाचे सुंदर मंदिर आहे. श्री जलाराम मंडळाच्या वतीने जलाराम जयंती उत्सव सोमवारी (दि. ३१) साजरा करण्यात आला.

सकाळी ११ वाजता जलाराम आरती या आरती, रात्री ७ वाजता दीप प्रज्वलन, सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत पालक मैदान युईएस स्कूल बोरी येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या वेळी गोवर्धन पालन, भरत ठक्कर, रमेश मेहता, दिनेश ठक्कर, श्यामजी ठक्कर व भक्तगण उपस्थित होते.



# वातावरणात बदल; आजारांना आमंत्रण

**पनवेल :** गेले काही दिवस रायगडासह राज्यात पाऊस परतला असल्याने वातावरणात बदल झाला आहे. ऑक्टोबर हिट उशीरा सुरू झाली असून ऊनाचा तडाखा वाढला आहे. तसेच हिवाळा ऋतूदेखील सुरू झाल्याने थंडीची चाहूल रात्री जाणवत आहे. सकाळ, दुपार कडक ऊन व रात्री, पहाटे गार वारा यामुळे वातावरणात बदल जाणवू लागला आहे. अशा वातावरणाचा मानवाच्या शरीरावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. सर्दी, खोकला, घसा खवखवणे अशा अनेक आजारांना आमंत्रण मिळत असल्याने डॉक्टरांनी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# सांस्कृतिक वारसा जगणारे नाटक गोधडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी रंगभूमी दिनानिमित्त थिएटर ऑफ रेलेवन्स शुभचिंतक आणि प्रयोगकर्ता प्रस्तुत रंगचिंतक मंजुल भारद्वाज लिखित आणि दिग्दर्शित नाटक गोधडी पनवेलच्या आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शनिवारी (दि. ५) सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

या नाटकामध्ये कलाकार अश्विनी नांदेडकर, सायली पावसकर, कोमल खामकर, तुषार म्हस्के, प्रियंका कांबळे, तनिष्का, प्रांजल,संध्या बाविस्कर, आरोही बाविस्कर आणि अन्य कलाकार असतील. नाटक गोधडी संस्कृतीचा आत्मशोध आहे. संस्कृती, काळ, माती आणि निसर्गासोबत विविध समाजातील सण, प्रथा, चालीरीती, परंपरा यांचा शोध घेऊन मानवी विवेकाचा नवा धागा विणते.





गोधडी भारताचा आत्मा आहे. भारताची विविधता हे नाटक स्पंदीत करते आणि आपल्यातील विवेकशीलतेला जागवते. या गोधडीत सामावले आहे आपले सारे जग. मनुष्याचे पाखंड आणि विकृतीला समूळ नष्ट करत मानवाच्या मूळ संस्कृतीचा शोध घेते. वर्चस्ववादी शोषणचक्राच्या मुळाशी जाऊन हिंसाचाराच्या विकृतीला आपल्या दृष्टीने अहिंसेची, मानवीय संवेदनांची आणि नैसर्गिकतेची संस्कृतीला उलगडण्याचा ध्यास आहे नाटक गोधडी.

थिएटर ऑफ रेलेवन्स नाट्य तत्व मागील ३० वर्षांपासून आपल्या नाट्य प्रस्तुतीतून निरंतर कलात्मक सृजन प्रक्रियांना उत्प्रेरीत करत आहे. सृजनशील विचारांच्या, कलासत्वाच्या, तात्विक प्रतिबद्धतेच्या आणि विवेकशील प्रतिरोधाच्या हुंकारने विश्वाला सुंदर आणि मानवीय बनवण्यासाठी समर्पित आहे.

मागील ३० वर्षांपासून ‘थिएटर ऑफ रेलेवन्स’ या नाट्य सिद्धांताने सतत कोणत्याही देशीविदेशी अनुदानाशिवाय आपली कलेप्रति जबाबदारी आणि कर्तव्ये निभावली आहेत. प्रेक्षक सहभागाच्या आधारावर मुंबईपासून मणिपूरपर्यंत हे ‘रंग आंदोलन’ सुरू आहे. ‘थिएटर ऑफ रेलेवन्स’ ने जीवनाला नाटकाशी जोडून आपल्या कलात्मक नाटकांच्या माध्यमातून फॅसिस्टवादी ताकदींशी ‘थिएटर ऑफ रेलेवन्स’ लढत आहे.

# अजिवलीतून एक जण बेपत्ता

**पनवेल :** आय. आर. बी कंपनीच्या रूममधून एक व्यक्ती कोठे तरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. चरवा सोमरा उरोव (वय ४२, मु. पो. अजिवली) असे त्याचे नाव असून उंची पाच फूट सात इंच, चेहरा उभट आहे. त्याने अंगात पिवळा टीशर्ट व काळा बरमूडा घातला आहे. त्याला हिंदी भाषा अवगत असून या व्यक्तीबाबत माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे (०२२–२७४५२४४४) किंवा पोलीस हवालदार धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# आदिवासी कुटुंबांना धान्य, लहान मुलांना खाऊचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटना जिल्हाध्यक्ष सागर काशिनाथ कुरंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभरी आदीवासीवाडीतील कुटूंबांना धान्य व लहान मुलांना खाऊचे वाटप रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी टेंभरी येथील आदिवासी वाडीतील गरजू ५० कुटुंबीयांना धान्य व लहान मुलांना खाऊवाटप करण्यात आले. या वेळी आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले. कार्यक्रमास पोलीस नाईक विशाल झावरे, सचिन गोंधळी, रोशन गोंधळी, मयुर डुकरे, सुशील कुरंगळे, सुनील कुरंगळे, मनीष कुरंगळे, मनीष सुरेश कुरंगळे, सदानंद गोंधळी आदी उपस्थित होते. ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटनेच्या वतीने रसायनी पाताळगंगा परीसरात समाजोपयोगी उपक्रम सुरू आहेत.



## संपादकीय

# लागोपाठ दोन दणके

तब्बल अडीच वर्षे महाराष्ट्रातील मतदारांच्या पाठंगुळी बसलेले महाविकास आघाडी सरकार सत्तेवरून खाली उतरले असले तरी त्यांच्या कार्यकाळात झालेले कारनामे फार काळ लपून राहण्यासारखे नाहीत. भ्रष्टाचाराची भुते कितीही खोल गाडली तरी कधी ना कधी ती पृष्ठभागी येतातच. तशी ती यावीत यासाठी शिंदे-फडणवीस सरकारने कंबर कसली आहे असे दिसते.

**कोरोना काळातील प्रचंड भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची कसून चौकशी करण्यास केंद्रातील महालेखापाल (कॅग) यांच्या कार्यालयाने दोन दिवसांपूर्वी मान्यता दिली होती. याचाच अर्थ कोरोना काळातील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश होण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपली आहे असा होतो. विधिमंडळाच्या मागील एका अधिवेशनात तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी कोरोना काळातील भ्रष्टाचाराचा पाढा घडाघडा वाचून सत्ताधारी महाविकास आघाडीच्या नेत्यांना अक्षरश: गारद केले होते, परंतु फडणवीस यांच्या भडिमारानंतरही ठाकरे सरकारने ढिम्म काही हालचाल केली नव्हती. आता राज्यात सत्ताबदल झाला आहे. त्यामुळे कोरोना काळात जे काही 'करून दाखवले' त्याचा हिशेब जनतेला द्यावाच लागणार आहे. नजीकच्या भविष्यकाळात या संशयास्पद प्रकरणांचा मोठा भांडाफोड होईल अशी शक्यता आहे. महाविकास आघाडीला मिळालेला हा पहिला दणका. त्यानंतर ४८ तास उलटण्याच्या आतच दुसरा दणका बसला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात राज्याबाहेर गेलेल्या उद्योगांबाबत श्वेतपत्रिका काढण्याचा निर्णय सरकारतर्फे जाहीर करण्यात आला आहे. वेदांत-फॉक्सकॉन, रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित बल्क ड्रग पार्क आणि टाटा एअरबस वाहतूक विमाननिर्मिती प्रकल्प असे मोठे प्रकल्प शिंदे-फडणवीस सरकारने महाराष्ट्राच्या हातातून घालवले अशी ओरड महाविकास आघाडीचे नेते करीत आहेत, परंतु हा अपप्रचार आहे हे साऱ्यांनाच ठाऊक आहे. शिंदे-फडणवीस सरकार अस्तित्वात येऊन जेमतेम तीन महिने उलटले आहेत. तरीदेखील, महाराष्ट्रातील उद्योग पळवून नेण्याचा प्रकार सुरू असल्याचे 'फेक नॅरेटिव्ह' माध्यमांकरवी चालवले जात आहे. या षड्यंत्राच्या मागे नेमके कोण आहेत हे संबंधितांना चांगलेच ठाऊक आहे. वास्तविक चोराच्या उलट्या बोंबा असा हा प्रकार आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात गुंतवणुकीस योग्य वातावरण राज्यात उरलेच नव्हते ही वस्तूस्थिती आहे. जे काही उद्योग राज्याबाहेर गेले, ते महाविकास आघाडी सरकारच्या काळातच गेले हे सिद्ध करणे फार अवघड नाही. त्यासाठी यासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्यात येईल, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे. पायउतार झालेल्या ठाकरे सरकारला हा दुसरा दणका बसला आहे. या दोन्ही दणक्यांचे परिणाम अर्थातच गंभीर असतील. अद्वातद्वा आरोप करणे, भावनिक राजकारण करणे या गोष्टी काही काळ फळे देतात हे खरे, परंतु अंतिमत: आकडेवारीच सरकारचे प्रगतिपुस्तक सिद्ध करत असते. कॅगची चौकशी आणि श्वेतपत्रिका असे दोन जालिम डोस ठाकरे गटाला आणि त्यांच्यासोबत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना आता पचवावे लागणार आहेत. उद्योगांच्या संदर्भात माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जी टीका केली, ती देखील त्यांना भोवण्याची शक्यता आहे. फडणवीस नेहमीच अभ्यासपूर्ण विधाने करतात. त्यांचा मुद्दा खोडून काढणे अनुभवी आणि जाणत्या नेत्यांनाही शक्य होत नाही. हे दोन्ही दणके महाविकास आघाडीला वठणीवर आणल्याशिवाय राहणार नाहीत.**

# औद्योगिक सुरक्षा काळाची गरज!

भारत देश विकसनशील देश आहे. आपल्या भारत देशामध्ये अनेक नवनवीन कारखाने उद्योगधंदे उदयास आलेले आहे. थोडक्यात भारतामध्ये औद्योगिक क्रांती झाली आहे. औद्योगिक क्षेत्राने विस्तृत असा विकास केलेला आहे, परंतु या औद्योगिक क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षितता हीदेखील महत्त्वाची बाब ठरली आहे. त्यामुळेच २ नोव्हेंबर रोजी याबाबत जनजागृतीसाठी औद्योगिक सुरक्षा दिवस साजरा करण्यात येतो.



औद्योगिक सुरक्षिततेला अलिकडे खूप महत्त्व दिले जात आहे कारण दिवसेंदिवस वाढत चाललेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांसोबत काही ना काही घटना होतात. यामध्ये काही जण जखमी होतात तर काहीजण मृत्यूमुखीसुद्धा पडतात. त्यामुळे औद्योगिक सुरक्षा खूप महत्त्वाची आहे.

औद्योगिक क्षेत्रांमधून उत्पादन होणाऱ्या पैकी पाच टक्के उत्पादनाचे पैसे हे औद्योगिक सुरक्षिता मध्ये जखमी झालेल्या किंवा मृत्यूमुखी पडलेल्या परिवारांच्या देण्याकरीता खर्ची लावले जातात. औद्योगिक दुर्घटनांमध्ये मृत्यू होणाऱ्या लोकांची संख्याही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे औद्योगिक दुर्घटना यात का घडतात यामागचे कारण काय? हे शोधून काढण्यासाठी व औद्योगिक सुरक्षिततेकडे सर्वांनी एक पाऊल उचलायला हवे.

औद्योगिक कारखान्यांमध्ये २४ तास सुरू असलेली विविध यंत्रे आणि त्यांचे क्लिष्ट प्रक्रियांशी संबंधित तेथील कामगारांच्या सुरक्षिततेची व जीविताची सुरक्षा आपण समजून घेणे आवश्यक आहे. कामगार ज्या कंपनीमध्ये, ज्या यंत्रावर, ज्या परिस्थितीमध्ये, जे काम करत असतो, ते आपले काम, यंत्र व त्याचे तंत्र व्यवस्थित शास्त्रीयदृष्ट्या बारकाव्यानिशी समजून घेणे म्हणजेच औद्योगिक सुरक्षा. यंत्रामधील व कामकाजाशी संबंधित धोके याची पूर्ण माहिती घेणे, त्याची जाण असणे, त्याच्या अनुषंगाने संभाव्य धोके कसे टाळता येतील, त्यासाठी अवलंबल्या जाणाऱ्या उपाययोजना व सुरक्षित साधने यांचे ज्ञान व परिपूर्ण वापर करणे म्हणजे सुरक्षाच आहे.



**औद्योगिक सुरक्षिततेची आवशक्यता :**

औद्योगिक क्षेत्रांमध्ये जर असुरक्षितता असेल तर त्याचे रूपांतर भयंकर दुर्घटनांमध्ये होऊ शकते. जसे की, एखाद्या फॅक्टरीमधील विजेचे कनेक्शन व्यवस्थित आहे की नाही हे न पाहताच तेथील कामगारांना कारखान्यातील मशिनरी चालविण्याकरिता दिल्या असता याचा काय विपरित परिणाम होऊ शकतो याची आपणास खात्री असेलच. म्हणून औद्योगिक सुरक्षिततेची खूप आवश्यकता आहे. औद्योगिक क्षेत्रांमधील सुरक्षितता व त्यांची आपण पडताळणी करू शकतो. जर इतर काही समस्या किंवा अडचणी येत असल्यास आपण ते दुरूस्त करून कित्येक कामगारांना जीवनदान देऊ शकतो, तसेच औद्योगिक असुरक्षितता आपण पूर्णतः समाप्तदेखील करू शकतो. आपल्या देशामध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेल्या औद्योगिक असुरक्षिततेमुळे कित्येक लोकांचा बळी जात आहे. त्याला आळा घालण्याकरीता आपल्याला औद्योगिक सुरक्षिततेची खूप आवश्यकता भासत आहे.

**औद्योगिक सुरक्षितता घेण्याकरिता घ्यावयाची काळजी**

**१. काम करणाऱ्या लोकांचे योग्य नियोजन :** जर एखाद्या औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारा कामगार हा शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कमजोर असेल, अस्वस्थ असेल तर त्याला त्वरीत कामावरून काढणे गरजेचे आहे. एवढेच नसून आपल्या कारखान्यांमध्ये किंवा कोणत्याही उद्योगांमध्ये एखाद्या व्यक्तीची निवड करताना ती व्यक्ती त्या कार्यामध्ये कितपत कुशल आहे हे तपासणेदेखील आवश्यक आहे.

**२. तंत्रज्ञानाचाचा योग्य वापर :** आजच्या काळामध्ये तंत्रज्ञानाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केलेली आहे. त्यामुळे कुठल्याही क्षेत्रामध्ये तंत्रज्ञान हे वापरले जाते. त्यातल्या त्यात औद्योगिक क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात वापरले जाते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान हे सुरक्षित पद्धतीने हाताळले आणि वापरले पाहिजे. जेणेकरून औद्योगिक क्षेत्रामध्ये कुठलीही दुर्घटना होणार नाही.

**३. योग्य ऑपरेटर प्रशिक्षण :** औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना योग्य ऑपरेटर प्रशिक्षण देणे खूप गरजेचे आहे. कोणत्याही औद्योगिक कंपनीमध्ये नोकरीची हमी जरी असली तरी काम करणाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

**४. दुर्घटना प्रतिबंध आणि योग्य शिक्षण :** औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या काम करायचे नेतृत्व कौशल्य हे त्या क्षेत्रातील पर्यवेक्षकाच्या नेतृत्वाखाली होत असते. त्यामुळे अपघातांच्या प्रतिबंधाबाबत कामगारांना जागरूक करणे हे पर्यवेक्षकाचे काम असते. पर्यवेक्षकांचा मुख्य हेतू हा कामगारांना सुरक्षिततेबाबत शिकविणे हा आहे जेणेकरून कामगार आपल्या क्षेत्रामध्ये असुरक्षित परिस्थिती ओळखू शकतात व त्या परिस्थितीमध्ये काय करायचे त्याचे शिक्षण त्यांना उपलब्ध होईल.

**सुरक्षा कार्यक्रम :**


औद्योगिक क्षेत्रांमध्ये वेळीच सुरक्षा कार्यक्रम करून कामगारांना सुरक्षिततेची जाणीव करून देणे गरजेचे आहे. अपघात कधी आणि का होतात हे ओळखण्यासाठी सुरक्षा कार्यक्रम महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे सुरक्षा कार्यक्रमांचे मुख्य उद्दिष्ट हे अपघात कमी करणे व दक्षता याची जाणीव करून देईल. कामाशी संबंधित बहुतेक अपघात टाळणे शक्य आहे असे गृहीत धरून सुरक्षा कार्यक्रम सुरू केला जातो.

**सुरक्षा पद्धत व व्यवस्था कशी असावी?**

औद्योगिक, अभियांत्रिकी, रासायनिक, धोकादायक, अतिधोकादायक आदी स्वरूपाचे लहान-मोठे अनेक उद्योगधंदे असतात जेथे अनेक अकुशल ते प्रशिक्षित कामगार असतात. याठिकाणी बऱ्याचदा अनाहूतपणे किंवा अतिआत्मविश्वासामुळे किरकोळ, गंभीर दुर्घटना झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे प्रत्येकाने आपल्यावर कुटुंब अवलंबून आहे, याचा विचार करून कामगाराने व उद्योग व्यवस्थापनाने सुरक्षिततेचे नियम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. उदा. हेल्मेट, सेफ्टी गॉगल्स, आवश्यकतेप्रमाणे इअर मफ, हँड ग्लोव्हज, बॉडी हार्नेस-प्रन, बॉयलर सूट अथवा इतर सुरक्षा पोशाख, सेफ्टी शूज अशी सुरक्षासाधने कामगाराने वापरणे गरजेचे आहे, तसेच कंपनी व्यवस्थापनाचीही ती जबाबदारी आहे.

कंपनी परिसरच नव्हे तर आता शहरामध्ये स्थापत्य, विद्युत विषयक अनेक विकास कामे सध्या सर्व शहरात सुरू आहेत. उदा. उंच इमारतींची बांधकामे, मेट्रो, बीआरटी, वेगवेगळ्या प्रकारचे केबल टाकण्यासाठीची खोदाई, उत्खनन आदी ठिकाणी मानवी सुरक्षा महत्त्वाची असते. येथेही सुरक्षा साधनांबरोबरच कामाच्या पद्धतीतही सुरक्षित प्रणाली अवलंबणे तितकेच महत्त्वाचे आहे.

बऱ्याच वेळा असे दिसते की, सुरक्षा साधने वापरण्याचा कंटाळा कामगार करतात. मला काही होत नाही, मला कामाचा अनुभव आहे, हा फाजील आत्मविश्वासही कारणीभूत ठरतो. ही अत्यंत धोकादायक बाब आहे, तसेच काही अस्थापनेमध्ये ठेकेदार, मालक यांना, सुरक्षिततेचे नियम, संबंधित सुरक्षा उपकरणे व त्याचा वापर, याची माहिती नसल्याने अथवा याबद्दल अनास्था असल्याने, कामगारांचे व नागरिकांचे जीव आणि एकूणच परिस्थिती धोक्यात येते. म्हणूनच आपल्या कुटुंबाच्या व एकूणच देशाच्या उन्नतीसाठी आपण सर्वांनी सुरक्षिततेचे नियम पाळणे, उपकरणांचा वापर करणे आणि एकूण सुरक्षिततेविषयी गांभीर्याने घेणे ही काळाची गरज झाली आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# 'अशा प्रकारे' सहज ओळखा बनावट वेबसाईट




मोबाइल आणि इंटरनेटमुळे कोणतेही काम एका क्लिकवर करणे सहज शक्य झाले आहे. अनेक कामांसाठी आपण बँक खाते, वैयक्तिक डेटा अशी माहिती बऱ्याच वेबसाईट्सशी शेअर करतो, पण हे वेबसाईट्स खरे आहेत की बनावट आहेत हे कळायला मार्ग नसतो. त्यामुळे अनेकजण सायबर क्राइमच्या जाळ्यात अडकतात आणि त्यांना मोठा आर्थिक फटका बसतो. यापासून नागरिकांना वाचवण्यासाठी सीइआरटीने (कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम) फेक वेबसाईट्स कशा ओळखायच्या याचे काही मार्ग सांगितले आहेत.

डिजिटायजेशनमुळे सर्व व्यवहार ऑनलाईन केले जात आहेत. ऑनलाइन पेमेंट करताना त्या वेबसाईटला आपली सर्व माहिती शेअर करणे गरजेचे असते. अशात ती वेबसाईट विश्वासार्ह आहे की नाही हे तपासण्याचा कोणताही मार्ग नसतो. याचाच फायदा घेऊन अकाउंट डिटेल्स, डेटा चोरी करणे असे प्रकार घडतात. यांमुळे भारतात सायबर क्राईमचे प्रमाण गेल्या काही वर्षांमध्ये वाढले आहे. या जाळ्यात तुम्हालाही अडकवले जाऊ शकते, यापासून सावध राहण्यासाठी तुम्ही वापरत असलेली वेबसाईट विश्वासार्ह आहे की नाही हे तपासणे आवश्यक आहे. हे कसे तपासता येईल जाणून घ्या.

-कोणत्याही वेबसाईटवरून ब्राऊजिंग करताना, शॉपिंग किंवा रजिस्ट्रेशन करताना त्या वेबसाईटचा युआरएल नेहमी तपासा. यासाठी तुम्ही सर्च इंजिनमध्ये त्या वेबसाईटचे रिव्ह्यूदेखील तपासू शकता.


-जर एखाद्या वेबसाईटवर चुकीची वाक्य लिहलेली असतील म्हणजे व्याकरणामध्ये चुका असतील किंवा स्पेलिंगमध्ये चुका असतील, तर याचा अर्थ ती वेबसाईट विश्वासार्ह नाही.

-जर तुम्ही निवडलेल्या वेबसाईटवर अनेक जाहिराती दिसत असतील आणि त्यामध्ये आपोआप ऑडिओ प्ले होत असेल तर याचा अर्थ ती वेबसाईट विश्वासार्ह नाही.

# बॉलीवूडचा 'बादशाह' शाहरुख खान

## निमित्त

भारतीय हिंदी चित्रपटसृष्टी म्हणजेच बॉलीवूडचा बादशाह शाहरुख खान याचा आज २ नोव्हेंबर रोजी जन्मदिवस. शाहरूख हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वांत लोकप्रिय कलाकारांपैकी एक मानला जातो. चाहते त्याला 'किंग खान' असेही म्हणतात. शाहरूख खान दिलीप कुमार आणि अमिताभ बच्चन यांच्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीचा विशिष्ट काळ गाजवणारा अभिनेता म्हणूनही ओळखला जातो.



१९८०च्या दशकामध्ये फौजी, सर्कस या दूरचित्रवाणी मालिकांमध्ये शाहरूखने भूमिका केल्या. २५ जून १९९२ रोजी प्रदर्शित दिवाना या चित्रपटाद्वारे त्याने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. सुरुवातीला बाजीगर, डर या चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिका साकारून त्याने १९९५ सालच्या आदित्य चोप्रा दिग्दर्शित दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे या चित्रपटामध्ये प्रणयनायकाची भूमिका करून आपली पडद्यावरील प्रतिमा बदलली. त्यानंतर करण जोहर याच्या दिग्दर्शनाखाली कुछ कुछ होता है, कभी खुशी कभी गम या चित्रपटांत त्याने भूमिका केल्या.

शाहरूख खानने ५०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. त्याला १४ फिल्मफेअर पुरस्कार मिळाले असून फिल्मफेअर सर्वोत्तम अभिनेता पुरस्कार आठ वेळा मिळवणारा तो दिलीप कुमारसह दुसराच अभिनेता आहे. २००५साली त्याला भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. रेड चिलीज एंटरटेन्मेन्ट या कंपनीचा तो सहमालक आहे. भारतीय प्रीमियर लीगमधील कोलकाता नाईट रायडर्स या संघाचादेखील तो सहमालक आहे. २००७ साली कौन बनेगा करोडपती या लोकप्रिय दूरचित्रवाणी कार्यक्रमाचा तो सादरकर्ता होता. २००८मध्ये न्यूजवीक साप्ताहिकाने शाहरूखला जगातील ५० सर्वात प्रभावशाली व्यक्तींमध्ये स्थान दिले, तर २०११मध्ये लॉस एंजेल्स टाइम्स वृत्तपत्राने त्याचा जगातील सर्वात यशस्वी चित्रपट अभिनेता ह्या शब्दांत गौरव केला. खूप गरीब परिस्थितीमधून यश मिळवलेला हा लोकांचा खूप प्रिय कलाकार आहे. त्याचे चाहते संपूर्ण जगभर आहेत.

पडद्यावरची त्याची व काजोलची जोडी लोकप्रिय आहे. ग्लॅमरच्या दुनियेत शाहरुख खानला ३३ वर्षे झाली आहेत. शाहरुख खानच्या प्रवासावर अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. त्यापैकी अजिताभ बोस लिखित 'इन लव्ह विथ शाहरुख खान' सर्वात खास आहे. हे एक पॉकेट बुक आहे, ज्याची संकल्पना खुद्द शाहरुखलाही खूप आवडली होती. यानंतर त्यांनी लेखक अजिताभ बोस यांना त्यांच्या वाढदिवसाच्या पार्टीला मुंबईपर्यंत आमंत्रित केले. बॉलीवूडचा 'बादशाह' शाहरुख खानची पत्नी गौरी खान एक इंटिरियर डिझायनर आहे. या दोघांनी २५ ऑक्टोबर १९९१ रोजी प्रेमविवाह केला होता. शाहरुख आणि गौरीला आर्यन खान, सुहाना खान, अबराम खान ही तीन मुले आहेत.

**-साभार विकीपिडीया**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : शेतकरीवर्गाकडून भातपिकाची कापणी होऊन मळणी सुरू झाली आहे. पावसाचा काही नेम नसल्याने शेतकारी ऊन पडताच झोडणी करून भात घरी आणण्यासाठी घाई करीत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर



# गवतावर अनवाणी चालल्याने होतात फायदे

निसर्ग आपल्याला हवे ते सगळे देत असतो. निसर्गात आपल्याला सगळ्या प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत. निरोगी जीवनासाठी मानवाला निसर्गाची साथ खूप महत्त्वाची आहे. जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंट अँड पब्लिक हेल्थमधील एका अभ्यासानुसार असे समोर आले आहे की, आज लोक वाईट काळात जगत आहेत कारण त्यांचा पर्यावरणाशी सहसा संबंध येत नाही.

अभ्यासात असेही समोर आले आहे की, जर एखाद्या व्यक्तीला पृथ्वीच्या विद्युत उर्जेची जोड मिळाली तर त्यांच्या आयुष्यात अनेक प्रकारचे मानसिक बदल होतात. अशाच एका संशोधनातून हेही समोर आले आहे की गवतावर चालण्याने माणसाच्या आरोग्यावर अनेक सकारात्मक परिणाम होतात. चला तर मग जाणून घेऊयात गवतावर चालण्याचे कोणते फायदे आहेत.

**मनाला शांती मिळते :** हिरव्या गवतावर पहाटे अनवाणी चालल्याने मानसिक शांती मिळते. अनेक रिपोर्ट्र्समधून ही बाब समोर आली आहे.

**झोपेस त्रास होत नाही :** आजच्या काळात प्रत्येक माणूस कमी झोपेचा सामना करत आहे. अशा वेळी तुम्हालाही शांत झोप घ्यायची असेल, तर आजपासूनच हिरव्यागार गवतावर अनवाणी चालायला सुरुवात करा. दररोज किमान अर्धा तास गवतावर चाला. याचा फायदा नक्कीच होतो.

**हृदय निरोगी राहते :** रोज गवतावर अनवाणी चालल्याने हृदयाला खूप फायदा होतो. गवतावर चालल्याने हृदयाचे ठोके आणि रक्तदाब संतुलित राहतो.

**डोळ्यांसाठीदेखील चांगले :** गवतावर अनवाणी चालण्यानेही डोळे निरोगी राहतात. असं म्हणतात की गवतावर चालल्याने दृष्टी सुधारते.

# साजगाव यात्रेचे नियोजन खोपोली पालिकेकडेच

## विठोबा देवस्थान कमिटीच्या वादावर अखेर पडदा

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

श्री विठोबा देवस्थान ताकई धाकटी पंढरीचा अध्यक्ष कोण? हा वाद वर्षभारापासून न्यायप्रविष्ट आहे. दोन्ही पक्षकारांची सखोल चौकशी केल्यानंतर (चौकशी क्र. २२८/२०१६) धर्मादाय आयुक्तांनी कमिटी ग्राह्य धरत अध्यक्ष सुधीर पाटील हेच असल्याचा निकाल दिला. मात्र विरोधी गटाला निकाल मान्य न झाल्याने कार्यालयाचा ताबा न देणे, यात्रेतील व्यापाऱ्यांना यात्रेतील जागा देण्यासाठी दबावतंत्राचा वापर करणे असे प्रकार घडत असल्याची चर्चा सुरू होत्या. दरम्यान, खालापुरचे तहसीलदार आयुब तांबोली यांनी मंगळवारी (दि. १) बैठक बोलावून अध्यक्ष सुधीर पाटील आणि कमिटीशी चर्चा करून यात्रा उत्सवात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.



संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या साजगाव येथील विठ्ठल मंदिराची ओळख संपूर्ण महाराष्ट्रात धाकटी पंढरी अशी आहे. कार्तिकी एकादशीला येथे मोठी यात्रा भरते. १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेत राज्यभरातून हजारो भाविक येतात. यात्रा दोन दिवसांवर आली असून कोरोनाच्या संकटानंतर पहिल्यांदाच यात्रा होत असल्याने सर्वांनाच मोठी उत्सुकता आहे. दरम्यान, देवस्थान कमिटीचा वाद गेल्या काही दिवसांपासून अलिबाग येथील जिल्हा धर्मादाय आयुक्तांच्या न्यायालयात सुरू आहे. ॲड. किरण कोसमकर, ॲड. प्रदीप तांडेल यांनी बाजू मांडल्यावर धर्मादाय आयुक्तांनी अनंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली कमिटी बरखास्त करून २०१६मध्ये अस्तीत्वात असलेली सुधीर पाटील यांच्या अध्यक्षतेखालील कमिटी कायम करण्याचे आदेश दिले आहेत.

धर्मादाय आयुक्तांनी लेखी आदेश दिल्यानंतरही अनंत पाटील आणि त्यांचे सहकारी मंदिरावरचा आपला हक्क सोडायला तयार नाहीत. त्यामुळे साजगाव येथील विठ्ठल मंदिर देवस्थान कमिटीचा वाद विकोपाला गेला आहे. एकाच वेळी दोन अध्यक्ष कार्यरत असल्याने मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी राजकारण तापले होते. खोपोली पोलीस ठाण्याचे निरिक्षक शिरिष पवार यांनी स्वतः धर्मादाय आयुक्तांची सोमवारी (दि. ३१) समक्ष भेट घेवून सत्यता तपासून पाहिली असता चौकशी क्र. २२८/२०१६ नुसार अध्यक्ष सुधीर पाटील हेच असल्याचा स्पष्ट झाले. मात्र तरीही अनंता पाटील यांना निर्णय मान्य नसल्याने पुन्हा मंगळवारी (दि. १) तहसीलदार आयुब तांबोली यांच्या दालनात बैठक बोलवली होती.

खोपोली नगरपालिकेचे प्रशासक अनुप दुरे, पोलीस निरीक्षक शिरीष पवार, श्री विठोबा देवस्थान ताकई धाकटी पंढरीचे अध्यक्ष सुधीर पाटील, सदस्य अतुल पाटील, नरेंद्र शहा, काशिनाथ पाटील, तानाजी संदेश पाटील आदि या बैठकीला उपस्थित होते. धर्मादाय आयुक्तांच्या निर्णयानुसार देवस्थान कमिटी ग्राह्य आहे. धाकटी पंढरीत यात्रा भरविण्यासाठी वन विभागाने खोपोली नगर परिषदेला पाच एकर जागा यात्रेसाठी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे यात्रा खोपोली नगर परिषदेच्या माध्यमातून होईल. कायदा व सुव्यवस्था मोडण्याचा कोणीही प्रकार केल्यास कारवाई करू, असे तहसीलदारांनी खडसावून सांगितले. तर २२८ प्रमाणे धर्मादाय आयुक्तांनी निकाल देवूनही विरोधक निकाल मान्य न करता कार्यालयाचा ताबा न देणे त्यानंतर यात्रेतील व्यापाऱ्यांना जागा देण्यासाठी दबावतंत्र वापर करीत असल्याची माहिती अध्यक्ष सुधीर पाटील, सदस्य अतुल पाटील यांनी तहसीलदारांनी दिली.

**साजगाव यात्रेला फक्त ४८ तास राहिले असून खोपोली नगर परिषद आणि पोलीस यंत्रणा यांच्या माध्यमातून यात्रेचे नियोजन करण्यात येईल. तहसीलदारांनी दिलेल्या सूचनांचे पालन करू**

**–सुधीर पाटील, अध्यक्ष,**
**श्री विठोबा देवस्थान कमिटी, ताकई**

# मुरूडमध्ये आनंदाचा शिधा वाटपातील अडथळा दूर

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्यातील शिंदे व फडणवीस सरकारकडून मिळाणाऱ्या आनंदाचा शिधा वाटपाला मुरूड शहरात सुरूवात झाली आहे. श्री स्वामी समर्थ रास्तभाव धान्य दुकानात सचिन कासेकर यांच्या हस्ते लाभार्थींना आनंदाचा शिधा संचाचे वाटप करण्यात आले. या वेळी लाभार्थ्यांनी दुकानात गर्दी केली होती.

दिवाळी सणानिमित्त राज्य शासनाने नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त प्रत्येक शिधापत्रिकाधारकास एक किलो रवा, एक किलो चणाडाळ, एक किलो साखर आणि एक लीटर पामतेल या चार शिधाजिन्नसांचा समावेश असलेला ‘आनंदाचा शिधा‘ संच १०० रुपयांमध्ये देण्याचा निर्णय घेतला आहे. आनंदाचा शिधा ऑनलाइन पद्धतीने म्हणजेच पॉसमशीनच्या माध्यमातून वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र मुरूड तालुक्यात पॉससर्व्हर वारंवार डाऊन होत असल्याने आनंदाचा शिधा वाटपाला उशीर होत होता. त्यामुळे ग्राहकांपर्यंत आनंदाचा शिधा संच पोहचू शकला नव्हता. आता आनंदाचा शिधा ऑफलाइन पध्दतीने वाटत करायला सुरुवात करण्यात आली आहे. मुरूड शहरात आनंदाचा शिधा संच वाटपास सुरुवात झाली आहे.




## पाहिजेत

**महिला क्लार्क + अकाऊटंट**

- **संस्था** : **आदर्श को. ऑ. हौ. सो. लि. (पनवेल)**
- **कामाचे तास** : आठ तास (8 Working Hours)
- **शैक्षणिक पात्रता** : कमीत कमी B.Com
- **पगार** : शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव यावर ठरवला जाईल.
- **महत्त्वाचे** : १) अर्ज स्वहस्ताक्षरात करावा. २) सर्व सर्टीफिकेटस् बायोडेटाला जोडावित.
- **संपर्क** : नीलम शहा (सेक्रेटरी)
- **संपर्क नंबर** : ९८३३८६३६५०

**सही**

शिक्का

**अध्यक्ष : संतोष मुनोध**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी खालील वर्णन केलेली नियंत्री सत्ता प्रकार जमीन मिळकत मौजे जांभिवली, तालुका : पनवेल, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्री. कृष्णा बारकु कोंडीळकर व इतर ७ यांच्या कडुन पुर्ण मालकी हक्काने खरेदी घेणेचे ठरविले आहे .

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जांभिवली, तालुका : पनवेल, जि. रायगड .**

| अ.क्र. | मालकाचे नाव | सर्व्हे.नं. | हिस्सा नं | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. कृष्णा बारकु कोंडीलकर व इतर | ४१ | १ व | ०.३३.६० | ५.३० |

सदर मिळकती वर आगर तिच्या कोणत्याही भागावर इतर कोणाला हक्क हितसंबध व तारण, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, मत्युपत्राकीतदान साठेकरार वहीवाट दावा कोणाचाही कसलाही हक्क हित संबंध मालकीदान, बोजा जाणे येण्याचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदीपत्राच्या पुराव्यासह नोटीस प्रसिदध् झाल्यापासुन (१४) चौदा दिवसाच्या आत खालीसही करणार त्यांच्या पत्यावर पुराव्यासह आपली हरकत नोंदवावी. या नंतर येणा–या तकारी अगर हरकती आमचे अशीलावर कोणत्याही कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : कराडे बुद्रुक
दिनांक : ०१/११/२०२२

**सही/–**
**ॲड. योगेश अरूण मानकवळे**
**मु. स्वमिनी निवास ओम नगर रीस**
**ता. खालापूर, जि. रायगड.**
**पिनकोड : ४१०२२२**
**मो. ९८३३१३०९४५**

**सही/–**
**ॲड. जितेंद्र धर्मराज जाधव**
**मु. कराडेबुद्रुक, पो. गुळसुंदे,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**पिनकोड : ४१०२०७**
**मो. ९८६०८७६१४७**

## माणगावमध्ये विकासकामांचे भूमिपूजन



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील पळसगाव, निजामपूर भागातील विविध विकासकामांचे भूमिपूजन शनिवारी (दि. २९) आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

माणगाव तालुक्यातील होडगाव कोंड ते गांगवली रायगड–पाचाड जोड रस्ता (८५ लाख ५० हजार रुपये), होडगाव कोंड ते तोंडलेकरवाडी रस्त्यावरील पूल (दोन कोटी ६० लाख रुपये), तोंडलेकरवाडी ते साळवे रस्ता डांबरीकरण (२३लाख ७५ हजार रुपये), कुंभारवाडी ते समर्थ बैठक हॉल ते ताम्हाणे रस्ता डांबरीकरण (२० लाख रुपये), गांगवली नळ पाणीपुरवठा योजना (९६ लाख ४० हजार ४१२ रुपये) या विकासकामांचे भूमिपूजन शनिवारी आमदार गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे ज्येष्ठ नेते राजीव साबळे, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, माजी विभाग प्रमुख गणेश समेळ, विभाग प्रमुख मनोज सावंत, युवासेना जिल्हा प्रमुख अच्युत तोंडलेकर, उपविभाग प्रमुख समीर तेटगुरे, महाड विधानसभा मतदार संघ युवासेना प्रमुख वैभव मोरे, उपतालुका प्रमुख नितीन पवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. त्यामुळे संबंधित ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.

## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड
## जाहिर सूचना

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शहर उपजिविका केंद्र (CLC) करीता जागा / इमारत भाडेतत्वावर घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शहर उपजिविका केंद्र (CLC) करीता मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला वरील जागा भाडेतत्वावर घेणेकामी इच्छुक व्यक्ती / संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत. सदरील जागा / इमारत बांधकाम पूर्ण असलेली, वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असावी. जागा/ इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी २ वर्षांचा असेल.

| अ.क्र. | ठिकाण | आवश्यक जागेचे क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | पनवेल | १००० चौ. फुट |

इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी जागेचे ठिकाण, भाडे इ. तपशीलासह आयुक्त, पनवेल महानगरपालिका या नावाने मुख्यालय, पनवेल महानगरपालिका येथे दिनांक १०/११/२०२२ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत अर्ज जमा करावेत.

जा.क्र. पमपा/माव्य/९९२२/प्र.क्र.३२/४५१/२०२२
दिनांक :– ०२/११/२०२२.

**सही/–**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## उरण नगरपरिषद, उरण
## जाहिर निविदा सूचना२०२२

मा.मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद,उरण.यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार /पुरवठादार कडुन दोन लिफाफा पध्दतीने सिलबंध दरपत्रक मागविणेत येत आहे.

| अ.क्रं | कामाचा तपशिल | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| | उरण नगरपरिषदेच्या सर्व विभागाकडिल अभिलेख ठेवणेकरिता १० नग लोखंडी रॅक खरेदी करणेकामी ठेकेदार नियुक्त करणे बाबत. | १०००/– | ५००/– | कार्यदिश दिलेपासुन १ महिना |

**निविदा सादरीकरण तपशिल.**

| अ.क्रं | तपशिल | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द दिनांक | दिनांक ०२/११/२०२२ | |
| २ | निविदा सादर करणेची मुदत | दिनांक ०२/११/२०२२ | दिनांक ११/११/२०२२ |
| ३ | निविदा कागदपत्र तपासणी दिनांक | दिनांक १४/११/२०२२ | |
| ४ | निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक १५/११/२०२२ रोजी अथवा नगरपरिषदेच्या सोईनुसार अन्य दिवशी. | |

**अटी/शर्ती :–**

१) निविदा फॉर्म कार्यालयीन (सुटीचे दिवस वगळून ) वेळेत उरण नगरपरिषद भांडार विभागात विहित मुदतीत निविदा फॉर्म फी भरुन उपलब्ध होतील.
२) सिलबंध निविदा/दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीत कार्यालयीन ( सुटीचे दिवस वगळुन ) वेळेत उरण नगरपरिषद् कार्यालयात आवक जावक विभागात विहित मुदतीत स्विकारणेत येतील.
३) नमुद केलेल्या कामाकरिता इसारा रक्कम विहित मुदतीत लेखा विभागात स्विकारणेत येतील.
४) निविदा सादर करतेवेळी लिफाफा क्रं १ मध्ये १) पॅनकार्ड,२ नोंदणी प्रमाणपत्र ४) जी.एसटी प्रमाणपत्र ५)फॉर्म फी भरल्याची पावती ६) इसारा रक्कम भरल्याची पावती.
तसेच लिफाफा क्रं २ मध्ये दरपत्रक इ.कागदपत्र सिलबंध करुन दोन्ही लिफाफे विहित मुदतीत समक्ष नगरपरिषद आवक जावक विभागात सादर करणेत यावेत. पोस्टाने अथवा इतर मार्गाने पाठविलेल्या निविदा स्विकारणेत येणार नाहीत याची नोंद घ्यावी.
५) विहित मुदतीत प्राप्त निविदा शक्यतो त्याच दिवशी अथवा नगरपरिषदेच्या सोईनुसार उघडणेत येतील.
६) कोणतेही निविदा /दरपत्रक स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेस असेल.
७) याबाबत तपशिलवार माहिती नगरपरिषदेच्या भांडार विभागात मिळेल.

**जा.क्र/उनप/ भांडार विभाग/२०२२ दिनांक ०१/११/२०२२**

**सही/–**
**(श्री. राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद, उरण**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२२/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

**१)श्री कैलास वसंत लोखंडे**
रा श्रीकुंज को–ऑप. हौ.सो., रूम नं. २०६ ४८/बी, सेक्टर नं. १४, कामोठे गाव, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८

२) श्री. विलास तनु कांबळे
रा, शुभम कॉम्प्लेक्स, बिल्डिंग नं. ४ अे, २०२, सेक्टर–६, कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड ४१०२०६

३)श्री. सिध्दार्थ रमेश भोसले
रा.२/सी विग, शुभगन कॉम्प्लेक्स, सेक्टर नं.७, प्लॉट नं.२५ मे, कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड. ४१०२०८ — **प्रतिवादी**

**दावा रूपये १८४४३/–**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १८/११/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीशी अन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/१०/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड–४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२३/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

२) श्रीमती आशा सुनिल साळवे
रा, श्रीयोग कॉम्पलेक्स, सेक्टर नं.१२, प्लॉट न.१. कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड ४१०२०८

२) श्रीमती अनिता सिध्दार्थ भोसले
रा. २/सी विंग, शुभांगन को–ऑप. हौ.सोसायटी, सेक्टर नं.७, प्लॉट नं.२५ अे, कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड ४१०२०८

**३) श्री वंसत धनू लोखंडे**
रा.श्रीकुंज को–ऑप हौ. सो., रूम में २०६, ४८/बी, सेक्टर में. १४, कामोठे गाव, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०८ — **प्रतिवादी**

**दावा रूपये २२६७४/–**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १८/११/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीशी अन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/१०/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड–४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२४/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

१) श्रीमती अनिता सिध्दार्थ भोसले
रा. २/सी विंग, शुभंगल को–ऑप. हौ.सोसायटी, सेक्टर नं.७, प्लॉट नं.२५ अे, कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड ४१०२०८

२) श्रीमती आशा सुनिल साळवे
रा, श्रीयोग कॉम्प्लेक्स, सेक्टर नं.१२, प्लॉट न.१. कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड ४१०२०८

**३) श्री वंसत धनू लोखंडे**
रा.श्रीकुंज को–ऑप हौ. सो., रूम नं २०६, ४८/बी, सेक्टर में. १४, कामोठे गाव, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०८ — **प्रतिवादी**

**दावा रूपये १५४०६/–**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १८/११/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीशी अन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/१०/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड–४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२७/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री वंसत धनू लोखंडे**
रा. श्रीकुज को–ऑप हौ.सो.,रुम नं, २०६, ४८/बी, सेक्टर न. १४, कामोठे गाव, ता.पनवेल, जि. रायगड ४१०२०८

२) सौ. आशा सुनिल साळवे
रा.श्रीयोग कॉम्प्लेक्स, सेक्टर न.१२, प्लॉट नं.१, कामोठे, ता. पनवेल. जि–रायगड

३) सौ अनिता सिध्दार्थ भोसले.
रा. २/सी विग, शुभगल को–ऑप हौ सोसायटी सेक्टर न ७, प्लॉट न.२५ अे, कामोठे, ता–पनवेल, जि–रायगड. — **प्रतिवादी**

**दावा रूपये १८००५/–**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. १८/११/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/१०/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड–४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# नवी मुंबईत राष्ट्रभक्तीचे एकात्म दर्शन

## तिरंगी मानवी एकता साखळीतून राष्ट्रीय एकता दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनमोल योगदान देणारे स्वातंत्र्य सेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीदिनाचे अर्थात राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिका मुख्यालयासमोरील सर्व्हिस रोडवर महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या समवेत सर्व अधिकारी, कर्मचारीवृंद यांनी मानवी एकता साखळी करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रसारित केला.

पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या पंचप्राण संकल्पनेत एकता ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील एकता व अखंडतेसाठी अनमोल योगदान दिले आहे. त्यांच्या देशभक्तीचा यथोचित सन्मान करण्यासाठी शासन निर्देशानुसार एकतेचा उत्सव साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने एकता दिनानिमित्त महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार शहरात विविध ठिकाणी नागरिकांच्या सहभागाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचारी यांनी एकतेचा संदेश प्रसारणासाठी अभिनव पध्दतीने तिरंगी मानवी एकता साखळीचे आयोजन करून राष्ट्राची एकता व अखंडता समर्थ राखण्यासाठी एकतेचे आवाहन केले. वास्तुरचनेचा देशातील एक उत्तम नमुना असणाऱ्या महापालिकेच्या आयकॉनिक वास्तूसमोर सर्व्हिस रोडवर महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे आणि सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी या मानवी एकता साखळीत सहभागी होत हातात सलग तिरंगा पकडून राष्ट्रभक्तीचे एकात्म दर्शन घडविले. पावसाळी कालावधीत लावला न जाणारा लिम्का बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये नोंदीत २२५ फूट उंचीच्या ध्वजस्तंभावरील प्रतिकात्मक राष्ट्रध्वजही एकता दिनाचे औचित्य साधून फडकविण्यात आला.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या देशभक्तीचा सन्मान करतानाच त्यांच्या एकात्म व अखंड भारताच्या विचारांची व मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश प्रसारित करीत महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्यासह नवी मुंबईकर नागरिकांनीही एकता दिनानिमित्त आयोजित उपक्रमांमध्ये सहभागी होत एकात्मतेचे दर्शन घडविले.

## प्रकल्पग्रस्तांकडून बीपीसीएल कंपनी गेट बंद आंदोलनाचा इशारा

**उरण : प्रतिनिधी**

बीपीसीएल कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांनी न्याय मिळवून घेण्यासाठी ९ नोव्हेंबर रोजी बीपीसीएल कंपनीला गेट बंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनाला उरण तालुक्यातील सर्व पक्षीय नेत्यांनी पाठिंबा दिला आहे.

उरण येथील बीपीसीएल प्रकल्पात सुमारे १५० प्रकल्पग्रस्त शेतकरी मागील ३० वर्षांपासून अद्यापही नोकऱ्यांपासून वंचित आहेत. या प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचा नोकऱ्यांसाठी गेल्या ३० वर्षांपासून जोरदार संघर्ष सुरू आहे, मात्र ३० वर्षांच्या संघर्षानंतरही प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला नसल्याने प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पाच्या प्रवेशव्दारावरच बेमुदत सुरू केले आहे. साखळी उपोषणानंतरही बीपीसीएल प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने प्रकल्पग्रस्तांनी ९ नोव्हेंबर रोजी गेट बंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत ३० वर्षांपूर्वी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील या प्रकल्पासाठी भेंडखळ, बोकडविरा, डोंगरी, फुंडे आदी गावातील सुमारे ३०० शेतकऱ्यांच्या २०७ एकर जमीन संपादित करण्यात आलेल्या आहेत. जमिनी संपादन करताना प्रकल्पग्रस्तांना वारेमाप आश्वासने देण्यात आली होती. यामध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याच्या आश्वासनांचा समावेश आहे, मात्र आजतागायत ३०० प्रकल्पग्रस्तांपैकी फक्त १७० लोकांनाच नोकऱ्या मिळाल्या आहेत. उर्वरित प्रकल्पबाधीतांनाही प्रकल्पात नोकऱ्या देण्याच्या मागणीसाठी मागील ३० वर्षांपासून बीपीसीएलविरोधात प्रकल्पग्रस्तांचा जोरदार संघर्ष सुरू आहे.



## रसायनीत एकतेची शपथ आणि दौड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्यात राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पोलीस अधीक्षक रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली एकता शपथ आणि दौड या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त रसायनी पोलीस ठाण्यात पोलीस अधिकारी, कर्मचारी, पोलीस पाटील, पत्रकार आणि नागरिक यांना पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांनी शपथ दिली. देशाची अखंडता, एकता आणि सुरक्षा अबाधित ठेवण्याची तसेच त्यासाठी आपले योगदान देण्याची प्रत्येकाने शपथ घेतली.

शपथ ग्रहणनंतर पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि पिल्लई महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चार किलोमीटरची दौड रसायनी पोलीस ठाण्यातून निघाली. ही दौड सिध्देश्वरी कॉर्नर ते बॉम्बे डाईंग कंपनी तेथून रसायनी पोलीस ठाणे अशी चार किमी एकता दौड काढण्यात आली. यात पिल्लई कॉलेजचे साठ विद्यार्थी, रसायनी पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

## उरणच्या वीर वाजेकर महाविद्यालयात प्रतिमा पूजन

**उरण : वार्ताहर**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय एकता दिन व भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले.

या वेळी प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे जीवन कार्य व त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्व डॉ. पवार यांनी उलगडून सांगितले. राष्ट्रीय एकता दौडच्या आयोजनाप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४० स्वयंसेवकांनी एकता दौडमध्ये सहभागी झाले. प्रा. सुप्रिया नवले, अस्मिता ठाकूर, प्रा. श्रीकांत गोतपगार, बाळकृष्ण दगडे, कार्यालयीन, प्रमुख अविनाश पाटील, प्रा. मुजावर मॅडम, प्रा. अर्जुन पाटील तसेच कार्यालयीन सेवकांनी राष्ट्रीय एकता दौडमध्ये सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन प्रा. चिंतामण धिंदळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकार यांनी केले. कार्यक्रमाची पूर्व तयारी मयूर पाटील, अभिजित पाटील, तन्वी म्हात्रे, मंदिरा म्हात्रे, आरती सुरवसे, दीपेन तांडेल यांनी केली. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.



## कांद्याच्या दरात होणार वाढ?

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दोन आठवड्यापासून एपीएमसी बाजारात कांद्याच्या दरात सातत्याने वाढ पहावयास मिळत आहे. मागील आठवड्यात गुरुवारी आणि त्यानंतर शनिवारी कांद्याच्या दरात किमान पाच ते सहा रुपयांची वाढ झाली आहे. तर आता सोमवारी (दि. ३१) बाजारात उच्चतम प्रतीचा कांदा प्रति किलो ३५ रुपयांवर पोहचला आहे. त्यामुळे गेल्या पाच दिवसांत १० ते १२ रुपयांनी वाढ झाली असून, महिन्याभरात कांद्याचे दर गगनाला भिडणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

वाशीतील कृषी उत्पन्न कांदा बटाटा बाजारात मागील आठवड्यापासून कांद्याची दरवाढ सुरू झाली आहे. मागील एक– दोन महिन्यांत राज्यात परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात झाला. त्यामुळे साठवणूकीचा जुना कांदा मोठ्या प्रमाणावर खराब होत आहे, तर नवीन लाल कांद्याच्या हंगामालाही फटका बसला आहे. त्यामुळे बाजारात उच्चतम प्रतिचा कांदा कमी प्रमाणात दाखल होत असून हलक्या प्रतीचा कांदा अधिक आहे, मात्र घाऊक बाजारात सर्वात उच्चतम प्रतीच्या कांद्याला अधिक मागणी आहे. कांद्याचा पुरवठा कमी असल्याने एक नंबरवर असलेल्या कांद्याची दरवाढ होत आहे.

महिन्याभरात कांदा चाळिशीपार करणार असल्याचे भाकीत वर्तविण्यात येत असून किरकोळ बाजारातही पन्नाशी गाठणार असल्याची चर्चा सुरू आहे.



### बटाट्याचे दरही वाढले

*स्थिर असलेल्या बटाट्याचे दर या आठवड्यात वाढण्यास सुरुवात झाली आहे. सध्या बाजारात जुना बटाटा मोठ्या प्रमाणावर असून एक ते दोन गाड्या नवीन बटाटा आवक होत आहे.* नवीन बटाट्याला अधिक मागणी असल्याने २५ रुपये अधिक दराने विकला जात आहे, ची माहिती घावक व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली.

## गड–किल्ले स्पर्धेत रचित म्हात्रे प्रथम

**उरण : वार्ताहर**

सारडे विकास मंचाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गड–किल्ले स्पर्धेला बालमावळ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत रचित म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, तर रुद्र पाटील याने द्वितीय क्रमांक मिळविला.

गेली पाच वर्ष या मंचाच्या वतीने गड किल्ले तयार करण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले जाते. यात ३५हून अधिक गड किल्ले तयार करण्यात आले होते. रायगड, प्रतापगड, कर्नाळा आदी गड किल्ल्यांच्या प्रतिकृती मुलांनी साकारल्या होत्या. स्पर्धेत संस्कृती म्हात्रे, जय पाटील, अंश ठाकूर, राजेश पाशी, स्वाद पाटील व रिद्धी पाटील या सहा स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.



या कार्यक्रमासाठी रोहित पाटील आणि नितीन म्हात्रे यांचे विशेष सहकार्य लाभले, तर नागेंद्र म्हात्रे, राकेश पाटील, निवास गावंड, हरीश म्हात्रे, मिलिंद म्हात्रे, सचिन तांडेल, नंदकुमार तांडेल, प्रशांत म्हात्रे, रोहित पाटील, त्रिजन पाटील, प्रणय ठाकूर, विवेकानंद ठाकूर या सर्वांनी विशेष मेहनत घेतली.

## सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

थोर स्वातंत्र्य सेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि माजी पंतप्रधान प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील ॲम्फीथिएटरमध्ये आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून या महामानवांना अभिवादन करण्यात आले.



या वेळी अतिरिक्त आयुंक्त सुजाता ढोले व संजय काकडे, प्रशासन विभागाचे उपायुक्त नितीन नार्वेकर, शहर अभियंता संजय देसाई, परिमंडळ १चे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार व परिमंडळ २चे उपायुक्त डॉ. अमरिश पटनिगिरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, परवाना विभागाचे उप आयुक्त डॉ. श्रीराम पवार, सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकान, उपायुक्त अनंत जाधव, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, इटीसी केंद्र संचालक डॉ. वर्षा भगत, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील, शिक्षणाधिकारी अरुणा यादव आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या वेळी राष्ट्रीय ऐक्यासाठी सामुहिक शपथ घेतली.

## उन्हाचा तडाखा! बाजारात रसरशीत ताडगोळे दाखल

**उरण : रामप्रहर वृत्त**

पाऊस लांबल्याने ऑक्टोबर हिट ही उशिरा सुरू झाली असून आठवडा भरापासून सुरू झालेल्या कडक उन्हात अंगाची काहिली होत आहे. ती शमविण्यासाठी उरणच्या बाजारात रसरशीत ताडगोळे आले आहेत. मात्र ताडगोळ्यांचे आगमन लांबल्याने त्याची किंमत दहा रुपयांना एक नग म्हणजे १२० डझन आहे. ताडगोळे महाग असले तरी त्याला मागणी असून आवक वाढल्यानंतर किंमत कमी होण्याची शक्यता आहे.

परतीचा पाऊस लांबला असला आणि वत्तावरणात गारवा होऊन धुके पडू लागले आहे. तर काही प्रमाणात थंडीत ही वाढ झाली आहे. असे असले तरी सोमवारी पुन्हा एकदा पावसाने वातावरण निर्माण केले होते. त्यामुळे परतीचा पाऊस संपला का हा प्रश्न आहेच, मात्र मागील आठवडा भरापासून उन्हाचा तडाखा बसू लागला आहे. सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये पडणारे उन्ह सध्या नोव्हेंबर मध्ये ही पडू लागली आहेत. त्यामुळे दिवसभर उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची काहिली वाढू लागली आहे. निसर्गाच्या नियमाप्रमाणे फळांचे मोसमाही ठरले आहेत. नैसर्गिक पाण्याने भरलेले हे फळ चवीलाही गोड असून त्यामुळे शरीराला गारवा मिळतो. त्यानुसार ताडाच्या झाडावर येणारे ताडगोळे ही तयार झाल्याने त्याची विक्री बाजारात सुरू झाली आहे.

ताडगोळ्याचा मोसम उशिरा सुरू झाल्याने व ताडाच्या उंच झाडावर चढणाऱ्याची संख्या ही कमी असल्याने ती उतरविण्याचा खर्च वाढला आहे. त्यामुळे यावर्षी आगमनालाच ताडगोळ्याचा किमती वाढल्या असल्याची माहिती उरणमधील ताडगोळे विक्रेत्या सीताबाई यांनी दिली आहे.



## उरण येथे छट्पूजा उत्साहात



**उरण : वार्ताहर**

उरणमधील एनएडी पिन जेट्टी, नेव्हल स्टेशन करंजा, उरण पीरवाडी समुद्रकिनारी, उरण नगर परिषदेच्या विमला तलाव आदी ठिकाणी रविवारी (दि. ३०) सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळेला व सोमवारी (दि. ३१) सकाळी सूर्योदयच्या वेळेस उत्तर भारतीय नागरिकांनी सूर्य देवताला मनोभावे पूजा करून छट्पूजा केली.

सूर्यदेवताला पूजेसाठी विविध फळे नैवेद्य म्हणून ठेवली जातात. व सर्वांना प्रसाद म्हणून दिली जातात. झारखंड, बिहार, युपी या ठिकाणातून रहिवाशी उरण येथे कामानिमित्त आले आहेत. त्यामुळे आम्ही दरवर्षी मनोभावाने सूर्यदेवाची पूजा करतो, असे मंजू राकेश कुमार यांनी सांगितले.



उरणच्या बसंत पंचमी ट्रस्टने आयोजित केलेल्या पिरवाडी बीच येथे छट्पूजेमध्ये सरचिटणीस रंजन कुमार, खजिनदार राकेश कुमार, सेक्रेटरी ये. के. सिंग, मुख्य पेट्रोन दिनेश जैस्वाल, पी. टी. चौहान आदी उपस्थित होते. या वेळी तीन हजार उत्तर भारतीय उपस्थित होते.

## रसायनीत सूर्यदेवाची पूजा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसराने वेढलेला भाग असल्याने येथे कामानिमित्त व व्यवसायासाठी आलेले हिंदी भाषिक नागरिकांची संख्या मोठी आहे. हे नागरिक छट्पुजा उत्सव मोहोपाडा तलाव, रिस पुल व पाताळगंगा नदीकाठी मोठ्या उत्साहात साजरा करीत आहेत.

रसायनीतील मोहोपाडा तलाव, रिस पुलाजवळ हिंदी भाषिक नागरिक छट्पुजेनिमित्त एकत्र येतात. या वेळी छट्पुजेचा व्रत करणाऱ्या महिलांनी सुर्यदेवाची मनोभावे पूजा केली. रसायनी परीसरातील हिंदी भाषिकांनी चार दिवस अगोदरच उपवास करून तिसऱ्या दिवशी मावळत्या सुर्यांला अर्ध्य देण्यासाठी सायंकाळी रिस व मोहोपाडा येथे मोठी गर्दी दिसून आली. मावळत्या सुर्याला अर्ध्य देण्यासाठी महिला विविध वेशभूषेत पुजेचे साहित्य घेऊन रिस येथे जमले होते.





या वेळी छट्पूजेचा उपवास करणाऱ्या महिलांनी डुबत्या सुर्यांला अर्ध्य देण्यासाठी पाण्यात उभ्या राहून सूर्यपुजन केले. या वेळी सूर्यदेवाची प्रार्थना करून माझ्या कुटुंबाच्या जीवनात सुखसमृद्धी, आरोग्यसंपन्न राहू दे अशी सुर्याला विनवणी करून अर्ध्य दिला तर सोमवारी सकाळी उगवत्या सूर्याला अर्ध्य देवून उपवासाची सांगता करून पुजा रिस व मोहोपाडा येथे झाली. या वेळी हिंदी भाषिक नेते संतोष गुप्ता, विनोद जयस्वाल, गीता पांडे, प्रकाश भारद्वाज, राजनाथ पटेल, संतोष पांडे आदी उपस्थित होते.

# मुरुडमध्ये रेशन दुकानांचा सर्व्हर डाऊन

## पंधरा दिवसापासून पॉस मशीन बंद / लाभार्थी धान्यापासून वंचित

**मुरूड : प्रतिनिधी**

रेशन दुकानदारांच्या पॉस मशीनचे सर्व्हर गेल्या पंधरा दिवसांपासून डाऊन असल्याने मुरुड तालुक्यातील धान्य वितरण व्यवस्था कोलमडली आहे. याचा फटका शेकडो रेशनकार्डधारकांना बसत आहे. या प्रकारबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.



आधार क्रमांकानुसार मुरुड तालुक्यातील सर्व रेशन कार्डाची नोंदणी पॉस मशीनमध्ये करण्यात आली आहे. सर्व पॉसमशीन एका लहान अँटिनाद्वारे ऑनलाइन सर्व्हरला जोडल्या आहेत, मात्र मागील पंधरा दिवसांपासून सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे तालुक्यातील धान्यवाटपाचे काम ठप्प आहे. धान्याचा कोटा सर्व दुकानदारांनी आणून ठेवला आहे, मात्र ग्राहक दुकानात चकरा घालून, खाली हाताने परत जात आहेत.

मुरूड शहरात चार तर ग्रामीण भागात एकूण २८ रेशन दुकाने आहेत. शासनाने संपूर्ण धान्य वाटप 'ऑनलाइन' केल्यामुळे धान्य दुकानदारांना 'ऑफलाइन' धान्यवाटप करता येत नसल्याने सामान्य जनतेमधून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे.

शहरातील रास्त भाव दुकानदारांनी सांगितले की, गेल्या पंधरा दिवसांपासून दुकानातील सर्व्हर सुरळीत चालत नाही. यांचा परिणाम पॉस मशीनवर झाला आहे. रेशनधारकांचा थम घेण्यासाठी वेळ लागत आहे. कधी कधी थम होत नाही. परिणामी रेशनकार्डधारकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. त्यामुळे आम्हाला रेशनधारकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. लवकरात लवकर सर्व्हरची समस्या दूर करावी, अशी मागणी तहसीलदार कार्यालयात केली आहे.

**सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे पॉस मशीन सुरळीत चालत नाही. त्यामुळे ग्राहकांचा थम बसत नाही. परिणामी रेशन कार्डधारकांना धान्य मिळत नाही. या संदर्भातील अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.**

**–सचिन राजे, अव्वल कारकून,पुरवठा विभाग, मुरूड तहसील कार्यालय**

**सर्व्हर डाऊनमुळे धान्य वितरणात अडथळा येत आहे, त्याचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे पाठविला. लवकरच सर्व्हर सुरळीत चालू होईल, असे सांगण्यात आले आहे.**

**–रवींद्र सानप, नायब तहसीलदार,मुरुड**

**शासनाने ऑनलाइन धान्य वितरण बंद करून पुन्हा ऑफलाइन पध्दतीने धान्य वितरण करावे, जेणेकरून लाभार्थ्यांना आपले धान्य वेळेवर घेऊन जाता येईल.**

**–दिलीप मिरजणकर, रेशनधारक कार्डधारक, मुरुड**

# बाळगंगा नदीपात्रात मृत माशांचा खच

**खालापूर : प्रतिनिधी**



बाळगंगा नदीपात्रात हजारो मासे मृत्युमुखी पडल्याने खालापूर तालुक्यातील वावोशी विभागात खळबळ उडाली आहे. या घटनेबद्दल नदीकाठी राहणाऱ्या ग्रामस्थांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

खालापूर तालुक्यातील काही कंपन्यांचे केमिकल मिश्रीत सांडपाणी येत असल्याने बाळगंगा नदीमधील जलचर मृत्यूमुखी पडण्याच्या घटना वारंवार होत आहेत. काही महिन्यापूर्वी उत्तम गॅलवा कंपनीचे केमिकलयुक्त सांडपाणी बाळगंगा नदीपात्रात आल्याने नदीतील हजारो मासे मृत्युमुखी पडले होते. त्या विरोधात ग्रामस्थांच्या तक्रारीची दखल घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उत्तम गॅलवा कंपनी बंद करण्याचे आदेश काढले तसेच १२ लाख रुपयांचा दंडही ठोठावला होता. त्यानंतरही बाळगंगा नदीपात्रातील माशांचे मृत्यूसत्र सुरू आहे. यामुळे नदीकाठच्या वावोशी, जांभिवली, नारंगी, डोणवत, नंदनपाडा, शिरवली येथील ग्रामस्थामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

दोन दिवसांपुर्वी बाळगंगा नदीत माशांचा खच पडला असून पाण्याला दुर्गंधीयुक्त वास येत आहे. सदर घटनेची माहिती मिळवितात प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्र अधिकारी अरविंद दाभाडे, मंडळ अधिकारी तुषार कामत, जांभिवलीचे सरपंच दिनेश घाडगे, गोरठण सरपंच विक्रांत पाटील, माजी सरपंच महेश पाटील व स्थानिक ग्रामस्थांनी सोमवारी नदीपात्राशेजारील कंपन्यांच्या परिसराची पाहणी केली. त्यावेळी जांभिवली, नारंगी, डोणवत, नंदनपाडा या ठिकाणच्या नदीच्या पाण्याचे नमुने तपासणीत सामान्य आढळले, मात्र मासे मृत्युमुखी कसे पडले, याचे गुढ कायम आहे. मृत्युमुखी पडलेल्या माशांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असल्याचे प्रदूषण नियम मंडळाचे क्षेत्र अधिकारी अरविंद दाभाडे व मंडळ अधिकारी तुषार कामत यांनी तयार केलेल्या पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे.

नंदनपाडा, शिरवली या गावाच्या पाणीपुरवठा योजना बाळगंगा नदीवर राबविण्यात आल्या आहेत. पिण्याच्या पाण्याची समस्या तर उद्भवणार नाही ना, या भीतीने नंदनपाडा, शिरवली ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नदीपात्रात केमिकल मिश्रीत सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर १५ दिवसात कारवाई करावी, अन्यथा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कोकण भवन येथील कार्यालयावर हंडा मोर्चा नेण्याचा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

**नदीमध्ये केमिकलयुक्त सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने तत्काळ कठोर कारवाई करावी; अन्यथा प्रशासनाविरुद्ध आंदोलन छेडत आरपारची लढाई कारण्यात येईल.**

**–दिनेश घाडगे, सरपंच, ग्रामपंचायत, जांभिवली, ता. खालापूर**

# तत्त्वज्ञान आचरणात आणून जीवनाचे सोने करा –प्रल्हाद पै

## जीवनविद्या मिशनचा वैजनाथ येथे आनंद मेळावा

**कर्जत : प्रतिनिधी**

वरवरचा 'मी' हरामी आहे आणि आत आहे तो खरा 'मी' आहे. दुसऱ्याला मिळाले की ज्याला वाईट वाटते, तो रोगी आहे. मत्सर करण्याऐवजी आपला स्तर वाढवा. सद्गुरू शहाणपण वाटतात, मात्र ते कसे वापरायचे ते आपण ठरवले पाहिजे, असे मार्गदर्शन जीवनविद्या मिशनचे विश्वस्त प्रल्हाद वामनराव पै यांनी सोमवारी (दि. ३१) कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथे केले. सद्गुरू वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जीवनविद्या मिशनच्या वैजनाथ येथील 'सद्गुरू सहवास'मध्ये आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



सोमवारी तिसऱ्या दिवशी झालेल्या कार्यक्रमात विश्वस्त प्रल्हाद पै उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. जीवनविद्या तत्त्वज्ञानाचे फक्त कौतुक करत बसण्यापेक्षा आयुष्यात ते आचरणात आणून जीवनाचे खऱ्या अर्थाने सोने करा, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

प्रल्हाद पै मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले, 'मी'पणा कमी करायचा असेल तुम्ही कर्माकडे लक्ष द्या. कौतुकाची अपेक्षा न करता कार्य करीत रहा. आपल्या सर्वांच्या ठिकाणी सतचितआनंद नांदत असतं, मात्र ते स्वतःच्या विसरात नांदत असतं. हा विषय ज्याला खऱ्या अर्थाने समजेल त्याचा परमार्थ आणि प्रंपच दोन्ही सुखाचा होईल.पहिल्या सत्रात ज्येष्ठ नामधारक, व्याख्यात्या अनिता मराठे यांनी मानसपूजेचे महत्त्व सांगितले. या वेळी ज्येष्ठ नामधारक अशोक परब यांचा जीवनविद्येचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या आनंद मेळाव्यासाठी खास अमेरिकेतून स्वाती मोरावले आणि आलोक मोरावले हे नामधारक उपस्थित होते. त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांनतर प्रतिज्ञा घेण्यात आली. प्रबोधक दशरथ शिरसाट यांनी अनेक नवीन नामधरकांना अनुग्रह दिला.

वैभव निंबाळकर, वस्तूविशारद प्रदीप सुभेदार, राजन मराठे, श्रीराम पराडकर, संतोष सावंत, अनिता मराठे, संजय हरपुडे, विद्या सुभेदार, दीपक काळे, स्वप्नील पराडकर, परशुराम राणे, उत्तम कोळंबे, बाबु घारे, सुदाम पवाळी, सुनिल मसणे, जीवनविद्या मिशन व जीवनविद्या फांउडेशनचे विश्वस्त दीपक काळे, पंकज नाईक, बन्सीधर राणे, श्रीराम मुल्लेमवार, विनोद मालुसरे, शीतल गोरे आदी या वेळी उपस्थित होते.

# प्रवासादरम्यान महिलेच्या मंगळसूत्राची चोरी

## माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई ते मोर्बा (ता. माणगाव) असा प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्समधील सुमारे दिड लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीस गेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. ३१) गुन्हा वर्ग करण्यात आला आहे.




माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी नीता नितीन खैरे (वय ४५, रा. परेल–मुंबई) या धार्मिक कार्यक्रमाकरिता महादपोली येथे जाण्यासाठी मांडवी एक्स्प्रेसने २८ आक्टोबर रोजी माणगाव रेल्वे स्थानकात उतरल्या. तेथून त्या शेअर रिक्षाने मोर्बा येथे गेल्या. तेथे रिक्षाभाड्याचे पैसे देण्याकरिता त्यांनी पर्स उघडली, त्यावेळी पर्समध्ये ठेवलेले सुमारे दिड लाख रुपये किमतीचे पाच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र मिळून आले नाही.

याप्रकरणी नीता खैरे यांनी दादर रेल्वे पोलीस ठाण्यात सीसीटीएनएस प्रणालीद्वारे ऑनलाइन फिर्याद दाखल केली. रेल्वे पोलिसांनी हा गुन्हा ३१ ऑक्टोबर रोजी माणगाव पोलीस ठाण्याकडे वर्ग केला असून, अधिक तपास सहाय्यक फौजदार एस. जी. भोजकर करीत आहेत.

# 'जेएसडब्ल्यू'तर्फे विद्यार्थ्यांसाठी दिवाळी शिबिरे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जेएसडब्ल्यू स्पायर साळाव प्रोजेक्ट आणि मॅजिक बस यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विद्यार्थ्यांसाठी कोर्लई, बोर्ली, वळके, थेरोंडा आणि वाघूळवाडी येथे गाव पातळीवर दिवाळी शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरांत पाच गावामधून ३००हून अधिक मुले सहभागी झाली होती.

दिवाळीच्या सुटीत घेण्यात आलेल्या या शिबिरांमध्ये मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य तसेच दहावीनंतरच्या शिक्षणाच्या संधी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बौद्धिक खेळ, आर्ट व क्राफ्ट यांचे प्रशिक्षण देण्यात आले. मुलांना सांघिक कार्य, सह–अध्ययन, शैक्षणिक विकास, सादरीकरण अशा जीवन कौशल्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. मुलांनीही अंगभूत कलागुण सादर केले.

जेएसडब्ल्यू सीएसआर प्रतिनिधी राम मोहिते, राकेश चवरकर, मॅजिक बसच्या समन्वयक डॉ. प्रगती पाटील यांच्यासह पालक व ग्रामस्थांनीही या शिबिरांना उपस्थिती दाखवली. मॅजिक बसच्या स्टाफ शीतल गायकर, पूजा ठाकूर, वर्षा ठाकूर, धनश्री पेणकर यांनी शिबिर यशस्वी केले. शैक्षणिक वस्तू आणि खाऊ वाटप करुन शिबिरांचा समारोप करण्यात आला.



# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम




**रोहे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहे येथील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. ३०) राष्ट्रीय एकता दिन अत्यंत उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण ९५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस भारत सरकारने राष्ट्रीय एकता दिवस म्हणून का घोषित केला, याची पार्श्वभूमी सांगून प्रा. तुळशिदास मोकल यांनी, सरदार पटेल यांच्या देशाच्या एकसंघतेसाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.

त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकता दौडमध्ये भाग घेतला. साहिल जोंधळे, कुशल राजपुरोहीत या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकता दौड कार्यक्रमचे नियोजन व अंमलबजावणीमध्ये महत्त्वाची भूमिका निभावली. हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभाग,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**मुरूड : प्रतिनिधी**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त मुरूड नगर परिषद कार्यालयात सोमवारी राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या वेळी नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार व नायब तहसीलदार गोविंद कोटंबे यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल व भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यालयाच्या प्रांगणात उपस्थितांना राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली. शपथीचे वाचन परेश कुंभार यांनी केले.

यानंतर मुरुड नगर परिषदेतर्फे शहरातील मुख्य बाजारपेठेत एकता रॅली काढण्यात आली होती. नायब तहसीलदार गोविद कोटंबे, नगर परिषदेचे परेश कुंभार, नरेंद्र नांदगावकर, दिपाली दिवेकर, कपिल वेहेले, प्रशांत दिवेकर, संजय वेटकोळी, प्रकाश आरेकर, सतेज निमकर, मनोज पुलेकर, सुदेश माळी, श्रावणी भायदे, सतिष जंजिरकर, जयेश चोडणेकर, प्रणाली करडे, नम्रता करडे, स्वप्नजा विरुकुड, प्रजोल गुरव, अभिजित कारभारी, स्मिता मुरूडकर, शिक्षक महेंद्र हावरे, संध्या नागे, अविनाश ठाकूर, दिप्ती एरंडे, उत्कर्षा रणदिवे, प्रविणा भोईनकर, प्रेरणा चौलकर, अक्षता भोईर, उझमा उलडे,राधिका सुर्वे, रुपेश भाटकर, मितेश माळी, मंगल मुलेकर यांच्यासह नागरिक या एकता रॅलीमध्ये सहभागी होते.







**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी संपूर्ण देशाला एकात्मतेच्या धाग्यात बांधण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळेच सरदार पटेल यांची जयंती (३१ ऑक्टोबर) देशात राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी केली जात आहे. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त सोमवारी पेणमध्ये नगरपालिका प्रशासन, तहसील कार्यालय, वन विभाग, प्रहार अकॅडमी, कमांडो अकॅडमी व अन्य सामाजिक संस्थांच्या माध्यमातून एकता दौड आयोजित करण्यात आली होती.

नायब तहसीलदार रमाकांत कालेकर, पेण नगरपालिकेचे प्रशासक जीवन पाटील, प्रशासकीय अधिकारी राजाराम नरुटे, लिपिक वृषाली निंबरे, सरकारी रुग्णालय कर्मचारी प्रभाकर सोनावणे, भरत निंबरे, किरण शहा, शिवाजी चव्हाण, शेखर अभंग, उमंग कदम, रमेश देशमुख यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी या एकता दौडमध्ये सहभागी झाले होते.यावेळी उपस्थितांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.

**म्हसळा : प्रतिनिधी**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. ३१) सकाळी म्हसळा सार्वजनिक तालुका वाचनालयात राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्याचा कार्यक्रम झाला.



म्हसळा तालुका सार्वजनिक वाचनालयात सोमवारी सकाळी देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती महादेव पाटील आणि वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे यांनी सरदार वल्लभभाई पटेल आणि श्री सरस्वती यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले.

म्हसळा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदीपान सोनावणे, वाचनालयाचे सचिव सचिव अशोक काते, संचालक सुनिल उमरटकर, पोलीस उपनिरीक्षक योगिता बांडे, कृषी विभागाचे विनोद सोनावणे, कृषी सहाय्यक गणेश देवडे, सूर्यकांत जाधव, ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले, पूनम राठोड, वाचक विठोबा पवार, प्रशांत करडे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.या वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावरील पुस्तकांचे आणि दिवाळी अंकाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

# वर्ल्डकपमध्ये इंग्लंडची न्यूझीलंडवर मात

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडने न्यूझीलंडला मात दिली. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने ब्रिस्बेनच्या गाबा स्टेडियमवर नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला होता. इंग्लंडने २० षटकांत सहा बाद १७९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंड संघ केवळ १५९ धावा करू शकला. उपांत्य फेरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या सामन्यात दोन्ही संघांनी विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र इंग्लंडने अखेरच्या पाच षटकांत शानदार गोलंदाजी करीत सामना २० धावांनी जिंकला. यासह इंग्लंडने उपांत्य फेरीसाठीच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या.

धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंड संघाकडून ग्लेन फिलिप्सने ३६ चेंडूंत ६२ धावा केल्या. ख्रिस जॉर्डनच्या जागी संघात स्थान मिळालेल्या गोलंदाज सॅम करनने त्याला लाँग ऑनवर झेलबाद केले.



याआधी ख्रिस वोक्सने डॅरिल मिशेलला तंबूत पाठवले. त्याचा झेलही जॉर्डनने लाँग ऑनवर घेतला. तो काही काळासाठी क्षेत्ररक्षण करण्यासाठी आला होता. मिशेलला केवळ तीन धावा करता आल्या.

शेवटच्या पाच षटकांत ५७ धावांची गरज असताना आधी वूडने तीन धावा व मिचेलचा बळी, तर वोक्सने पाच धावा देत निशामला बाद करीत इंग्लंडला सामन्यात पुढे केले. आणखी वेगाने धावा करण्याच्या प्रयत्नात फिलिप्स बाद झाला व न्यूझीलंडच्या आशांना सुरुंग लागला. त्याने ३६ चेंडूंत ६२ धावांची वादळी खेळी केली. शेवटी न्यूझीलंडचा डाव सहा बाद १५९ धावांवर मर्यादित राहिला.

तत्पूर्वी जोस बटलरने ४७ चेंडूंत ७३ धावा करीत मोलाचा वाटा उचलला. बटलरने या खेळीत सात चौकार आणि दोन षटकार मारले. लियाम लिव्हिंगस्टोनने १४ चेंडूंत २० धावा केल्या आणि तो फर्ग्युसनच्या गोलंदाजीवर बाद झाला. न्यूझीलंडसाठी फर्ग्युसन सर्वांत यशस्वी ठरला. त्याने ४५ धावांत दोन बळी घेतले. त्याचवेळी ईश सोधी सर्वांत किफायतशीर असल्याचे सिद्ध झाले. त्याने चार षटकांत २३ धावा दिल्या आणि एक विकेटही घेतली. बटलरला त्याच्या शानदार फलंदाजीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

# अफगाणिस्तान 'आऊट'; श्रीलंकेच्या आशा कायम

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत श्रीलंकेने अफगाणिस्तानवर सहा गडी राखून विजय मिळवला. या विजयाने श्रीलंकेचे उपांत्य फेरीत पोहचण्याच्या आशा अजूनही कायम आहेत, तर अफगाणिस्तान मात्र उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.

अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यात ब्रिस्बेनच्या गाबा स्टेडियमवर सामना खेळला गेला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांनी २० षटकांत आठ बाद १४४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल श्रीलंकेने १८.३ षटकात हे आव्हान पूर्ण केले.



श्रीलंकेने अफगाणिस्तानवर मात करीत सुपर-१२मध्ये दुसरा विजय नोंदविला. त्यांचे आता चार सामन्यांत चार गुण झाले आहेत. ते अजूनही उपांत्य फेरीच्या शर्यतीत आहे. दुसरीकडे या पराभवानंतर अफगाणिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याचे चार सामन्यांत केवळ दोन गुण आहेत. जरी त्यांनी एक सामना जिंकला तरी केवळ त्यांचे चार गुण होऊ शकतील. अफगाणिस्तानला आता न्यूझीलंडविरुद्ध खेळायचे बाकी राहिले आहे. उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडणारा अफगाणिस्तान हा दुसरा संघ आहे. त्याआधी नेदरलँड्स ग्रुप बीमधून बाहेर पडला आहे.

धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचे दोन फलंदाज लवकर बाद झाले, पण त्यानंतर धनंजय डी सिल्वाने डाव सावरत सर्वाधिक नाबाद ६६ धावा केल्या. ४२ चेंडूंच्या खेळीत त्याने सहा चौकार आणि दोन षटकार मारले. कुसल मेंडिसने २५, चरित असलंकाने १९, भानुका राजपक्षेने १८ आणि पाथुम निसांकाने १० धावांचे योगदान देत त्याला साथ दिली. कर्णधार दासुन शनाका फलंदाजीला आला मात्र तोपर्यंत सामना जिंकल्यातच जमा होता. त्यामुळे त्याला एकही धाव काढण्याची संधी मिळाली नाही. श्रीलंकेकडून तीन बळी घेणाऱ्या वानिंदू हसरंगाला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. तत्पूर्वी, अफगाणिस्तानने १५ षटकांत तीन बाद १०४ धावा केल्या होत्या. अफगाणकडून उस्मान गनीने सर्वाधिक २७ धावांचे योगदान दिले.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले होते. स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ सचिन नाईक आणि रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत चीफ रेफरी म्हणून डी. आर. साळसकर व पराग अंकोलेकर यांनी काम पाहिले.

**गटनिहाय निकाल**

नवोदित : प्रथम अन्स झकोटीया, द्वितीय शिवम राऊत, तृतीय क्रमांक संस्कार पाटील व प्रथम शहाजवाणी; ११ वर्षाखालील : मुली-विजेती त्रिशा शेखर पावशे, उपविजेती अंचित कौर, मुले-विजेता आरूश जैन, उपविजेता अद्वीत गुप्ता; १३ वर्षाखालील : मुली-विजेती रूद्रा राजेश सरवणकर, उपविजेती वेदिका भगत, मुले-विजेता पार्थ सतीशचंद्र बागाउली, उपविजेता अखिल गुब्बाला; १५ वर्षाखालील : मुली-विजेती अनोस्का पाटील, उपविजेती आदिती महाविर जाधव, मुले-विजेता स्वस्तिक कुंडू, उपविजेता पार्थ सतीशचंद्र बागाउली; १७ वर्षाखालील : मुली-विजेती अनोस्का पाटील, उपविजेती अनिशा पात्रा, मुले-विजेता विवेक पाल, उपविजेता स्वस्तिक कुंडू; १९ वर्षाखालील : मुले-विजेता विवेक पाल, उपविजेता अनिशा पात्रा, पुरुष दुहेरी : विजेते रिषब साळसकर व रजत तोरसकर, उपविजेते लोकेश पटवा व आशिष फोगट; ज्येष्ठ पुरुष : विजेते अतुल देशमुख, उपविजेते समीर शिंदे, पुरुष एकेरी : विजेते रजत तोरसकर, उपविजेते आशिष फोगट.

# बेबी एबीचे तुफानी शतक

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

सीएसए टी-२० चॅलेंजमधील सामन्यात टायटन्सचा फलंदाज डेवाल्ड ब्रेविसने तुफानी खेळी करीत शतक ठोकले. त्याच्या शतकाच्या जोरावर संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत तीन गडी गमावून २७१ धावा केल्या होत्या. प्रतिस्पर्धी संघ नाइट्सने २३० धावांपर्यंत मजल मारली.

दक्षिण आफ्रिकेच्या या युवा क्रिकेटपटूने ५७ चेंडूंत १६२ धावा केल्या. यात प्रत्येकी १३ चौकार आणि षटकारांचा समावेश होता. ब्रेव्हिस हा दक्षिण आफ्रिकेचा पुढचा एबी डिव्हिलियर्स मानला जातो आणि त्याला बेबी एबी म्हणूनही ओळखले जाते. ब्रेव्हिसचे हे टी-२०च्या कारकिर्दीतील पहिले शतक आहे. त्याने आतापर्यंतच्या ३२ सामन्यांत ८०९ धावा केल्या आहेत. आयपीएलमध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळतो.

# फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे सात्विक-चिराग जोडीला जेतेपद

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताच्या सात्विकसाइराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या तारांकित जोडीने बॅडमिंटन विश्वातील आपली भरारी कायम राखताना फ्रेंच खुल्या स्पर्धेचे (सुपर ७५० दर्जा) जेतेपद पटकावले. पुरुष एकेरीच्या अंतिम लढतीत सात्विक-चिराग जोडीने चायनीज तैपेईच्या लू चिंगा याओ आणि यांग पो हान जोडीला सरळ गेममध्ये पराभूत केले.



जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानी असलेल्या भारतीय जोडीने लू आणि यांग जोडीवर ४८ मिनिटे चाललेल्या अंतिम लढतीत २१-१३, २१-१९ अशी सरशी साधली. सात्विक-चिराग जोडीने या वर्षात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भारतीय खुली स्पर्धेचे (सुपर ५०० दर्जा) विजेतेपद, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक, थॉमस चषकाचे विजेतेपद आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावण्याची सात्विक-चिराग जोडीने किमया साधली आहे.

फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद मिळवणाऱ्या सात्विक-चिराग जोडीला भारतीय बॅडमिंटन संघटनेकडून (बाइ) पाच लाख रुपयांच्या रोख पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे, तसेच कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या शंकर मुथुस्वामीलाही पाच लाखांच्या रोख पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

# परळीत किक बॉक्सिंग कॅम्पला प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

युथ कराटे स्पोर्ट्स अकॅडमी महाराष्ट्र आणि विजय विकास सामाजिक संस्था रायगड यांच्या वतीने सुधागडमधील परळी येथे घेण्यात आलेला कराटे किकबॉक्सिंग कॅम्प मोठ्या उत्साहात झाला. या कॅम्पमध्ये उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या वेळी २५ सीनियर ब्लॅक बेल्टधारक उपस्थित होते.



या कॅम्पला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र किक बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार, बॉल कॉर्पोरेशन इंडिया या कंपनीचे प्लांट हेड मॅनेजर अजित शर्मा, किकबॉक्सिंग असोसिएशन पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष शुभम कानडे, किकबॉक्सिंग असोसिएशन पुणे सिटीचे व्हाईस प्रेसिडेंट राम तसेच रायगड जि. प. चे माजी सदस्य विजय भोईर उपस्थित होते.

या तीन दिवसीय कॅम्पमध्ये मुलांना कराटे, किकबॉक्सिंग, जुडो बेल्ट रेसलिंग, सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण देण्यात आले. या दरम्यान नऊ विद्यार्थ्यांनी ब्लॅक बेल्टची परीक्षा दिली. यामध्ये ऋग्वेद जेधे, प्रथमेश राठोड, शार्दुल सावंत, जिग्नेश म्हात्रे, अजय हेगडकर, वेद शिवकर, हंसिका मोकल, सायली शेडगे आणि सौम्या पिंपळे यांचा समावेश होता. त्यांना ब्लॅक बेल्ट शोदान ही पदवी बहाल करण्यात आली.

या उपक्रमावेळी सिनियर इन्स्ट्रक्टर म्हणून दीपक घरत, विकास भोईर, संतोष मोकल, मिलन जाधव, प्रगती भोईर, जयेश चौगुले, योगेश पाटील, विशाल, सुनील ठाकूर, अविनाश गावंड, तुळशीराम मुकादम, प्रकाश म्हात्रे, पांडुरंग पाटील, किरण भोपी, सुमित भालेकर, वैभव रहाते, नंदकुमार मोकल, मनीष पाटील, दीक्षा जैन तसेच मॅनेजिंग टीममधील संतोष मोकल, शुभम म्हात्रे, प्रितम मोकल, कंकेश गावंड, कमलाकर म्हात्रे, अजय हेगडकर, केदार खांबे, अभिषेक चौगुले, आकाश भिडे, किरण हरगिडकर, दीप म्हात्रे, उमंग तांडेल उपस्थित होते.






# जिल्हास्तरीय जिम्नॅस्टीक्स स्पर्धेत खेळाडूंचे सुयश

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

ॲम्युचर जिम्नॅस्टीक्स असोसिएशन ऑफ रायगड या संघटना व ओल्गा स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोलीत शिंदे स्पोर्ट्स सेंटर येथे आर्टिस्टिक जिम्नॅस्टीक्स रायगड जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच झाली. या वेळी जिल्हा संघटना सचिव अम्ब्रिता मोरे, खजिनदार अजित शिंदे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेत आठ वर्षाखालील मुलांच्या गटात श्रवीन नातेकर सुवर्ण, विहान सावंत रौप्य, अमोघ चिपळूणकर याने कांस्य, मुलींमध्ये वृक्षी मसावकर सुवर्ण, आराध्या भोजने रौप्य, हृशिता बाळकृष्ण कांस्य, १० वर्षाखालील मुलांमध्ये कुशाण त्रिवेदी, अगस्त्य अमोदकर व तनिश्क पवार आणि मुलींमध्ये मनीषा यादव, झिशा चांदे व आराध्या वाडेकर यांनी अनुक्रमे पदके जिंकली. १२ वर्षाखालील मुलांमध्ये पार्थिव पिल्ले, मनीष यादव, इशान कन्सल आणि मुलींमध्ये रूची जाधव, वैदेही गवळी व अनिया मेथा, १५ वर्षाखालील मुलांमध्ये शौर्य पिल्ले, मुलींमध्ये सई दामले, प्रांशी पटेल व अनन्या पटेल यांनी पदके प्राप्त केली. वरिष्ठ गट पुरुषांमध्ये अविघ्न पवार, राहुल कांबळे, प्रतिक चौरे, तर महिलांमध्ये रुजुल घोडके, सलोनी वडके व दिक्षा लावंड यांनी पदके जिंकून यश प्राप्त केले.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com